# माणूस

शनिवार । ११ ऑक्टोबर १९८० । एक रुपया

## विरोधकांची पहिली कमाई

→

दिवाळी अंकाची दवंडी....

मलपृष्ठ...

पुणे वार्ता

# ' जेल भरो ' आंदोलन

२ ऑक्टोवर ! राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती सर्व देशभर सालाबाद-प्रमाणे साजरी होत असताना महाराष्ट्रात मात्र एक अभिनव लढा या दिवशी पुकारण्यात आला – ' जेल भरो आंदोलन ! ' दलित व महिलावरील अत्याचार आणि महागाई या विरुद्ध हे आंदोलन छेडण्यात आलं आणि डाव्या आघाडीत सहभागी झालेल्या अरस-कॉंग्रेस, जनता पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लिकन पक्षाचे खोब्रागडे आणि गवई गट तसंच उजव्या व डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या सुमारे पन्नास हजार कार्यकर्त्यांनी या आंदोलनात भाग घेतला!

पुण्यातही महापौर सुरेश तौर आणि इतर स्थानिक नेत्यांच्या नेतृत्वाखाली सकाळी साडेअकरा वाजता सुमारे सातशे सत्याग्रही शनिवारवाड्यासमोरच्या पटांगणावर जमले. तिथूनच मोर्चाला सुरुवात झाली. जिजामाता उद्यान, वसंत टॉकीज, बुधवार चौक, बेल-बाग चौक, सिटी पोस्ट, सोन्या मारुती चौक, फडके हौद, दारुवाला पूल, रास्ते वाडा, नरपतगीर चौक, मालधक्का या मार्गाने तो स्टेशनवर पोचला. तिथे गांधीजींच्या पुतळ्यापाशी छोटीशी सभा झाली; सभेत महापौर सुरेश तौर व माजी गृहराज्यमंत्री भाई वैद्य यांची भाषणं झाली. सत्याग्रहयासाठी खास तयार करण्यात आलेल्या बिल्ल्यांचं वाटप झालं आणि श्री. तौर याच्या नेतृत्वाखाली पहिली तुकडी जिल्हाधिकारी अजित निंबाळकर याच्या सेंट्रल बिल्डिंगसमोरच्या कार्यालयाकडे रवाना झाली.

जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीसमोर एखाद्या लष्करी छावणीचं वातावरण तयार झालं होतं. काठ्या–लाठ्या घेतलेले व हेल्मेट घातलेल्या पोलिसाबरोबरच साध्या वेषातले पोलीस आणि एस. आर. पी. चे जवानही होते. चार–सहा पोलिसव्हॅन आणि वायर-लेसच्या गाड्या, जीप्स इत्यादी वाहनही आसपास रेंगाळत होती बहुतेक सर्व ज्येष्ठ पोलिस-अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवण्या-साठी जातीने उपस्थित होते. आंबेडकर उद्यानजवळ एस टी च्या दोन-तीन गाड्याही उभ्या होत्या.

रेल्वेस्टेशनवरून सत्याग्रहयाच्या तुकड्या यायला सुरुवात झाली. ' भ्रष्ट शासन नष्ट करा ! ' ' इंदिरा तेरा अजब खेल, खायी शक्कर पीलिया तेल ! ' ' भाववाढ रद्द करा, नाही तर खुर्ची खाली करा ! ' ' अंतुले शासनाचा धिक्कार असो ! ' इत्यादी घोषणा सत्याग्रही देत होते. सेंट्रल बिल्डिंगजवळच्या डॉ. आंबेडकर उद्यानात जाऊन बाबासाहे[बांच्या] पुतळ्याला हार घालून सत्याग्रही बाहेर येत व सत्याग्रह करत.

प्रत्येक तुकडीचा सत्याग्रह करण्याच प्रकारही निराळा होता. काही जण उद्याना तून बाहेर येत व शातपणे घोषणा देत पोलिस दाखवतील त्या एम. टी. मध्ये जाऊन बसत. काही जण पोलिसाचं कड तोडण्याचा थोडासा प्रयत्न करत आणि मग पोलिसव्हॅनमध्ये शिरत. दोन–तीन सत्या-ग्रहीनी मात्र पोलिसाना मस्त हुलकावणी दिली एकजण तर पोलासाशी आटयापाटया खेळत जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या भितीपर्यंत जाऊन पोचला; पण तिथं मात्र पकडला गेला ! आमदार विठ्ठल तुपे हेही अशीच पोलिसांची फळी तोडून कार्यालयाच्या दिशेने धावले; पण इतक्यात सफारी सूट घातलेल्या एका धिप्पाड तरुणाने त्यांच्या मानेभोवती हात टाकला आणि त्याना पकडण्यात आलं. सौ वत्सलाबाई गायकवाड याच्या, नेतृत्वा-खालील एक महिलाची तुकडी पोलिसानी अड-वली, पण त्यातल्या काही महिलानी जिल्हा-धिकाऱ्याच्या कार्यालयाकडे धाव घेतली. त्या वेळी महिलापोलीस उपलब्ध नसल्याने पुरुष पोलिसाना काहीच करता येईना. सत्याग्रही महिला तोपर्यंत जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयाजवळ पोचल्या; पण कार्यालयाची सर्व दारं बंद केली असल्यामुळं त्याना आत शिरता येईना. एवढ्यात महिलापोलिस आल्या व त्यानी सर्व सत्याग्रहयाना अटक केली.

या सबंध प्रकारात एक भाग पहाण्या-सारखा होता. प्रत्यक्ष सत्याग्रहात जरी फक्त


साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे

अंक : एकोणिसावा

११ ऑक्टोबर १९८०

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी .
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस,
१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी . ४४३४५९

सातशे जणानीच भाग घेतला होता तरी असंख्य लोक सत्याग्रह पाहण्यासाठी आले होते आणि अशा तऱ्हेने कोणी पोलिसाची तारावळ उडवून दिली की, टाळ्या पिटत होते. जे आपल्यासाठी करायची इच्छा पण करण्याएवढी धमक नाही ते दुसरा कोणी तरी करत असल्याचं पाहून मिळणारा आनद त्यामधून व्यक्त होत होता. तसच कुठे तरी सध्याच्या परिस्थितीबद्दल वाटणाऱ्या अस्वस्थतेलाही त्यातून वाट मिळत होती.

महापौर सुरेश तौर आणि माजी गृहराज्यमंत्री भाई वैद्य याच्याबरोबरच पिंपरी-चिंचवड नगरपालिकेचे अध्यक्ष डॉ. श्री. श्री. घारे, आमदार विठ्ठल तुपे, माजी खासदार व 'विशाल सह्याद्री'चे सपादक अनतराव पाटील, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बापूसाहेब थिटे, माजी खासदार सभाजीराव काकडे, माजी उपमहापौर मोहन पवार, शंकरराव मात्रे, जयसिंगराव जेधे, नामदेवराव सूर्यवशी, नगरसेवक शातिलाल सुरतवाला, दत्ता पासलकर, डॉ रमेश शहा, चिमणलाल शहा, पुणे शहर जनता पक्षाचे अध्यक्ष पोपटराव खिलारे, पुणे शहर अरस कॉंग्रेसचे अध्यक्ष शिवाजीराव ढमढेरे, अंकुश काकडे, नलिनी जवळेकर इत्यादी स्थानिक नेत्यांनी या सत्याग्रहाचे नेतृत्व केलं.

याच दिवशी भडकती महागाई, दलितांवरील अत्याचार, एस. टी. व पी. एम. टी. ची दरवाढ याकडे शासनाच लक्ष वेधण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या पुणे शहर शाखेने धरणे धरण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. सेनापती बापट पुतळा, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा, महात्मा फुले मडईतील लोकमान्य टिळक याचा पुतळा, नरपतगीर चौक आणि बोपोडी या पाच ठिकाणी सकाळी नऊ ते संध्याकाळी पाचपर्यंत हे धरणं धरण्यात आलं.

पुणे शहर भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष आमदार अण्णा जोशी, आमदार डॉ. अरविंद लेले, शिक्षण मडळाच्या अध्यक्षा सौ. मालतीबाई परांजपे, स्थायी समितीचे अध्यक्ष काका वडके, नगरसेवक नारायणराव वैद्य, दत्तोपत मेहेंदळे, गोविंदराव मालशे, हरिभाऊ महाजन, शिवाजीराव आढाव, राजाभाऊ सालेकर, नानासाहेब पाषाणकर, रत्नाकर वर्दे, सौ. जयश्रीबाई गवंडी, सौ. प्रज्ञा धारप इत्यादीच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमात सुमारे पाचशे कार्यकर्ते सामील झाले होते.

या सत्याग्रहातला एक भाग मात्र विचार करण्यासारखा होता. किती तरी स्त्री-पुरुष, 'जेल भरो' आदोलनात सामील झाले होते. त्यापैकी कित्येकाच्या अगावर धड कपडे नव्हते, पायात वहाणाही नव्हत्या! पक्षाच्या नावाने 'झिंदाबाद'च्या घोषणा देत ते या लढ्यात सामील झाले होते. कुणाच्या खांद्यावर जनता पक्षाचा झेंडा होता. कुणाच्या खांद्यावर कॉंग्रेसचा, तर कुणाच्या खांद्यावर लाल निशाण. 'झिंदाबाद-मुर्दाबाद'च्या घोषणा न चुकता देत ते चालले होते. आपण काही तरी फार मोठा लढा देत असल्याचे भाव त्यांच्या चेहऱ्यांवर होते; पण 'तुमच्या नेमक्या मागण्या काय?' असं जर त्याना विचारलं असतं तर पन्नास टक्के लोकाना तरी याचं उत्तर नीट देता आलं असतं की नाही कुणास ठाऊक! तरीही ते सर्वजण सामील झाले होते.

दीड-दीन महिन्यापूर्वी पुण्यातच शरद पवार आणि एस. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली महागाईच्या विरोधात पाच-सात हजाराचा मोर्चा भर पावसात निघाला होता. याच जिल्हाधिकारी कचेरीसमोर मोठी सभाही झाली होती. ही सर्वसामान्य माणसं कशाच्या बळावर अशी एकदम संघटित होऊ शकतात? आज विरोधी पक्ष तर इतके हतबल झालेले आहेत की केवळ पक्ष म्हणतो म्हणून किंवा एखादा नेता म्हणतो म्हणून पाच-सात हजाराचा मोर्चा निघणं निव्वळ अशक्य आहे. मग हे घडतं तरी कसं?

अर्थात हा अनुभव काही अपूर्व आणि अपरिचित नाही. स्वातंत्र्यसंग्रामापासून तर आणीबाणीविरोधी लढा व त्यानंतरच्या ऐतिहासिक निवडणुकीतही हा रोमाचकारी अनुभव आलेला आहे. तरीही त्यामागचं तर्कशुद्ध कारण आणि विश्लेषण अजून सापडलेलं नाही.

आज देशातील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती अशा वळणावर येऊन ठेपली आहे की जिथून मागं वळणं तर शक्य नाही, पण पुढंही जायला मार्ग सापडत नाही. १९८० च्या लोकसभा निवडणुकीनी भारतातलं राजकारण पुन्हा १९७१ वर नेऊन ठेवलं, अशी टीका-टिप्पणी अनेक राजकीय समीक्षकानी केली आहे; पण आता त्यालाही जवळजवळ आठ-दहा महिने झाले. दरम्यानच्या काळात आसामच्या प्रश्नानं डोकं वर काढलं, नैसर्गिक आपत्ती आल्या, मोरादाबाद व इतर भागामध्ये दंगली झाल्या, महागाई तर 'क्षणशः कणशश्चैव' या गतीने आणि पद्धतीने वाढतच आहे. या सर्वच बाबीची नोंद इथल्या सामान्य नागरिकाने घेतली आहे आणि तो अस्वस्थ झाला आहे.

त्यामुळं आजचं राजकीय-सामाजिक चित्र असं दिसतंय या परिस्थितीबद्दल समाजात अस्वस्थता आहे, असंतोष आहे; पण निश्चित मार्ग किंवा उपाय कोणालाच सापडलेला नाही. लोकसभा निवडणुकीत पानिपत झाल्यानंतर सर्वच विरोधी पक्ष आपापले घायाळ सैनिक आता कुठे गोळा करायला लागले आहेत. तंबू बदलताहेत, तबूचे रंग बदलताहेत; सैनिकाचीही देवाण-घेवाण सर्वच पातळ्यावर चालू आहे. आपला कोण आणि परका कोण याचा साक्षात्कारही या काळात पुन्हा एकवार घडत आहे. अशा वेळी हे 'जेल भरो आदोलन' यशस्वीपणे हाताळून विरोधी पक्षानी जानेवारीतल्या शिरकावानंतर प्रथमच आपल्या अस्तित्वाची जाणीव सत्ताधाऱ्यांना आणि जनतेला करून दिली आहे.

या आदोलनात जनतेने स्वत:ला पूर्णपणे झोकून दिलेले नाही. याची कारणं दोन- एक तर अजूनही जनतेची थोडी सहनशीलता शिल्लक आहे; नव्या केंद्र व राज्य शासनांना आपलं कर्तृत्व दाखवण्याची संधी आणखी थोडा काळ देण्याची जनतेची तयारी आहे आणि दुसरे म्हणजे वेळ आलीच तर ज्याच्या मागे स्वत:ला झोकून द्यावं किंवा ज्याच्या पाठीशी बिनदिक्कतपणे उभं रहावं असा राजकीय पक्ष किंवा नेता जनतेला मिळालेला नाही!

हे सर्व जरी खरं असलं तरी विरोधी पक्षांनी मात्र पुन्हा एकवार कंबर कसायला सुरुवात केली आहे हे मात्र या 'जेल भरो आंदोलना'तून निश्चितपणे स्पष्ट झालं.

महाराष्ट्रात अंतुले याचं शासन येऊन पुरते चार महिनेही झालेले नाहीत. या लहानशा काळातदेखील अंतुलेसाहेबानी जनहिताच्या दृष्टीने दोन–तीन चागल्या गोष्टी निश्चितच केल्या; पण ते जे करतात ते बोलून घालवतात असा त्यांचा अनुभव येत आहे. त्याच्या ज्येष्ठ सहकारी मंत्री शालिनीताई याही बाबतीत अंतुलेशी स्पर्धा करीत आहेतच, त्यामुळे विरोधी पक्षाला चांगलं खाद्य मिळत आहे. या दोघाची अशी बेजबाबदार वक्तव्यं आणि अजूनही शासनाच्या नियंत्रणात न आलेली सामाजिक – आर्थिक परिस्थिती या दोन गोष्टीचा पुरेपूर फायदा महाराष्ट्रातील विरोधी पक्षानी घ्यायला सुरुवात केली आहे. पहिलं पावसाळी अधिवेशन तर जवळजवळ विरोधीपक्षाच्याच ताब्यात गेलं होतं. हिवाळी अधिवेशनही जवळ येत आहे. दरम्यानच्या काळात स्वतःची गमावलेली विश्वासार्हता पुन्हा निर्माण करून जनमताचा पाठिंबा मिळवण्याचा विरोधी पक्षाचा प्रयत्न आहे त्या दृष्टीने विचार करता दोन ऑक्टोबरच्या आंदोलनाचा ‘विरोधकाची पहिली लक्षणीय कमाई’ असा उल्लेख करता येईल. आता सात ऑक्टोबरला भारतीय जनता पक्षातर्फे महाराष्ट्रात महागाई व अत्याचार विरोधी सत्याग्रह होणार आहेत व १५ ऑक्टोबरला विरोधी पक्षांनी ‘महाराष्ट्र बंद’ चाही आदेश दिलेला आहे, त्या वेळी ‘बंद’ला कोणतंही गंभीर हिंसक वळण लागू न देता तो यशस्वी करणं ही विरोधी पक्षनेत्यांची जबाबदारी आहे. ते ही जबाबदारी कशी पार पाडतात आणि त्यामध्ये जनतेचाही उत्स्फूर्त सहभाग किती प्रमाणात होतो यावर पुढल्या बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. *

## मराठी वाङ्मयातील ‘स्त्री-दर्शन’ एक श्रवणीय परिसंवाद

मराठीतील ज्येष्ठ लेखिका सौ. मालतीबाई बेडेकर याचा पंचाहत्तरावा वाढदिवस एक ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुणे शाखेने चागल्या तऱ्हेने साजरा केला. संबंधित व्यक्तीचा हार-तुरे देऊन सत्कार आणि मग तिच्याविषयी पाच-सहा जणानी काढलेले गौरवाच्या शब्दाचे बुडबुडे असं या कार्यक्रमाचं स्वरूप न ठेवता परिषदेने ‘मराठी वाङ्मयातील स्त्री-दर्शन’ या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला. मध्ययुगीन काळापासून तर अगदी स्वातंत्र्योत्तर काळापर्यंतच्या मराठी साहित्यातील स्त्री-दर्शनाचा आढावा डॉ. भीमराव कुलकर्णी, श्री. ज. जोशी, गं. ना जोगळेकर, ग. वा. बेहरे आणि डॉ. सौ. अंजली सोमण यानी घेतला.

सुरुवातीला परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. रा. करंदीकर यानी उपस्थिताचं स्वागत करून सौ. मालतीबाईंचा सत्कार केला व आता त्यांनी चरित्रात्मक आठवणी लिहाव्यात अशी सूचना केली. त्यानंतर परिसंवादात ‘मध्ययुगीन वाङ्मयातील स्त्री-दर्शन’ या विषयावर बोलताना डॉ. भीमराव कुलकर्णी म्हणाले–

‘मध्ययुगीन काळातील साहित्यात तत्कालीन समाजाचं दर्शन नाही, अध्यात्माचं चित्रण आहे. तसंच या काळात कथा-आख्यानामधून जी स्त्री रंगवली जात होती तिचा प्रत्यक्षातल्या स्त्रीशी काहीही साम्य-संबध नव्हता. त्या काळातील शाहिराच्या वाङ्मयात मात्र खरं मराठी मन दिसतं. मराठी समाजात स्त्रीबद्दल निर्माण झालेली विकृत वासना या वाङ्मयात जाणवते. तत्कालीन लावणीमध्येही त्या वेळच्या स्त्रिया बोलत नाहीत, तर त्या काळातील पुरुषाची वासना बोलते.

‘हे सर्व लक्षात घेतलं तर असं जाणवत की मध्ययुगीन काळातील साहित्यामध्ये घडणारं स्त्रीचं दर्शन अत्यंत जुजबी आणि कृत्रिम आहे. मग त्या मानाने तत्कालीन ऐतिहासिक वाङ्मयातील जिजाबाई, येसूबाई, आनंदीबाई, गोपिकाबाई या कर्तृत्ववान स्त्रियानी लिहिलेली पत्रं स्त्रीचं आणि स्त्री-मनाचं अधिक चागलं दर्शन घडवतात. म्हणूनच साहित्याच्या मर्यादांची जाणीव हा कालखंड करून देतो असं,जर म्हटलं तर त्यात फारसं वावगं होणार नाही.’

*डॉ. भीमरावानी फार मोठया काळाचा* आढावा अतिशय थोडक्या वेळात आणि तरीही मुद्देसूदपणे घेतला. मध्ययुगीन काळापासून तर पेशवाई बुडेपर्यंतच्या वाङ्मयाची चर्चा त्यांनी केल्यानंतर ‘हरिभाऊंच्या (आपटे) काळातील मराठी वाङ्मयातील स्त्री या विषयावर बोलण्यासाठी श्री. ज. जोशी उभे राहिले–

‘हरिभाऊंच्या काळात ‘बदमूर जोडपी’ अनेक होती’ असं खास ‘श्री. ज’ शैलीतलं निरीक्षण सुरुवातीलाच नोंदवून ते पुढे म्हणाले, ‘त्या काळात स्त्रीचा शारीरिक आणि मानसिक तुरुगवास फार मोठया प्रमाणावर होत असे. भोवतालच्या स्त्रीचं हे गाजलेपण हरिभाऊंना जाणवलं आणि आपल्या कादंबऱ्यामधून त्यानी ते उत्कृष्टपणे रेखाटल

‘हरिभाऊंचं संवेदनाक्षम मन या ममाजाला अतिशय विटलेलं होतं. इथे पिचत पडलेल्या स्त्रीबद्दल हरिभाऊंना अनुकंपा होती; पण या काळातील सर्वच लिखाणात समाजाचं चित्रण अगदी ढोबळपणानं केलेलं आढळतं आणि म्हणूनच या लेखनानं पुढच्या काळातील लेखकासमोर जास्त खोलात जाण्याची जास्त मोठी आव्हानं ठेवली.

सुरुवातीला गंभीर चेहऱ्याने मुद्दे लिहिलेला कागद हातात घट्ट धरून श्री. ज. बोलायला उभे राहिले तेव्हा दोन–अडीच महिन्यापूर्वी याच सभागृहात आमदार सौ. कुसुम अभ्यंकर याचं भाषण झालं होतं, तो प्रसग आठवला. ‘मी–एक स्त्री लेखिका’ या विषयावर कुसुमताई बोलल्या. श्री. ज. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. साहजिकच आपल्या समारोपाच्या भाषणात ते तमाम स्त्री–जातीची मस्त खिल्ली उडवतील असं वाटलं होतं; पण त्या दिवशी श्री. ज. काही निराळ्याच मूडमध्ये होते. प्रस्तुतच्या विषयावर तर ते नेहमीप्रमाणे बोलले नाहीतच; पण उगीचच डॉ. भालचंद्र फडके याचं ‘स्त्री–लेखिका–चिंता आणि चिंतन’ हे पुस्तक झोडपत बसले. श्री. जं. चे किमान अर्धा डझन तरी कार्यक्रम ऐकले असतील; पण त्यानी ‘बोअर’ केल्याचा अनुभव प्रथमच येत होतो. त्याची गाडी आजही त्याच वळणावर जाते की काय, असं सुरुवातीला वाटलं; पण बोलता बोलता लोकमान्य *टिळकाचं ‘जन्मसाल श्री. ज. चुकले आणि* तिथून त्याच्या गाडीनं जो वेग घेतला तो खुसखुशीत आणि खमंग मुद्द्याची स्टेशनं घेत शेवटपर्यंत कायम राखला.

पृष्ठ २१ वर

# इंदिरा काँग्रेस

## नव्या फेरजुळणीची चाचपणी

वा. दा. रानडे

महाराष्ट्र प्रदेश इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्ष श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यानी विरोधी नेत्याबद्दल कोणीही अशोभनीय वर्तन व भाषा करू नये अशी विनंती करणारी पत्रे राज्याचे सर्व मंत्री व प्रमुख पक्षकार्यकर्त्यांना पाठविली आहेत. अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या आदेशानुसार ही पत्रे आपण पाठविली असल्याचे त्यानी मुंबईस पत्रकाराना दिलेल्या मुलाखतीत सांगितले श्री. यशवंतराव चव्हाण याच्यावर ज्या पद्धतीने टीका करण्यात आली त्याबद्दल त्यानी नापसंती व्यक्त केली आणि यशवंतरावाच्या हातून काही चुका झाल्या असल्या तरी महाराष्ट्राचे ते भूषण आहेत.त्यानी केलेल्या कार्याचा कोणी अवमान करू नये असे त्यानी सांगितले.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रावरील कलंक आहेत अशी भाषा मुख्यमंत्री अंतुले यानी सातारा येथील त्याच्या गाजलेल्या भाषणात वापरली होती. प्रेमलाकाकीनी अंतुले याचे नाव घेऊन उल्लेख केला नाही तरी त्याची टीका त्यानाच उद्देशून होती हे उघड आहे; पण विरोधी नेत्यासंबंधी अशोभनीय भाषेबद्दल नापसंती व्यक्त करताना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे भूषण आहेत असे म्हणून मुद्दाम यशवंतप्रशस्ती करण्याची प्रेमलाकाकीना काय आवश्यकता होती ? की ही प्रशस्ती दिल्लीच्या आदेशावरूनच झाली अशी शंका मनात येते.

अंतुले याचे भाषण होऊन बरेच दिवस झाले प्रेमलाकाकीना त्याची भाषा खरोखरच नापसंत होती तर त्यानी लागलीच आपली नापसंती व्यक्त करायला हवी होती; पण तसे त्यांनी केले नाही. यशवंतराव महाराष्ट्राचे भूषण आहेत हा साक्षात्कार दिल्लीचा आदेश आल्यानंतर काकीना झाला काय ? आणि दिल्लीला तरी हा साक्षात्कार आजच अचानक कसा झाला ? यशवंतरावानी काही दिवसापूर्वी एका भाषणात इंदिराप्रशस्ती केली होती. यशवंतप्रशस्ती करून त्याची ही परतफेड इंदिरा काँग्रेस नेत्याकडून दिल्लीच्या आदेशानुसारच केली जात आहे काय ? राजकीय संबंधाची काही नवी माडणी किंवा जुळणी करण्याचे दिल्लीत घाटत आहे त्याचे हे निदर्शक आहे असे दिसते.

या दृष्टीने गेल्या काही दिवसातील घडामोडीचा विचार करता त्या केवळ योगायोगाने घडलेल्या नसून त्यामागे काही सूत्र आहे असे वाटते. माजी केंद्रीय अर्थमंत्री सी. सुब्रह्मण्यम याना पंतप्रधान श्रीमती गाधीनी दिल्लीस चर्चेसाठी बोलावले आहे, ते इंदिरा काँग्रेसमध्ये जाणार असल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे त्यानी तिचा इन्कार केला असला तरी असे इन्कार हे किती खरे मानावयाचे हे आता लोकाना चागले माहीत झाले आहे जगजीवनराम याची केंद्रीय मत्री झैलसिंग याच्याशी बोलणी झाली. तेही इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याच्या बातम्या आहेत. यशवंतराव चव्हाण याच्यासंबंधातही अशाच काही हालचाली चालू असण्याची शक्यता आहे. प्रेमलाकाकीच्या यशवंतप्रशस्तीचा अर्थ या सदर्भात लावायला हवा.

इंदिरा गांधी आपल्या मनाचा थाग कोणाला लागू देत नाहीत; पण सर्व जुन्या काँग्रेस जनाना एकत्र आणून पूर्वीसारखी प्रबळ काँग्रेस पुन स्थापन करावी अशा दृष्टीने त्या चाचपणी करीत आहेत काय अशी शंका येते. लोकसभा-निवडणुकीत इंदिरा काँग्रेसने दोनतृतियाश जागा जिंकल्या. त्यानतर नऊ राज्यात झालेल्या विधानसभा-निवडणुकीतही इंदिरा काँग्रेसने मोठे यश मिळविले. अशा परिस्थितीत सुब्रह्मण्यम, जगजीवनराम आणि चव्हाण याना इंदिरा काँग्रेसमध्ये आणावे असा विचार इंदिराजीच्या मनात का येऊ लागला असावा ? त्याचे कारण गेल्या नऊ महिन्यांच्या परिस्थितीत शोधावे लागेल. भाववाढ आटोक्यात आणण्यात इंदिरा गांधीच्या सरकारला यश न आल्याने सरकारविरुद्ध असंतोष वाढत आहे. १९७१ – ७२ मधील तडफ व पकड इंदिरा नेतृत्वात राहिलेली नाही. प्रभावी पक्षसंघटना उभारण्यासाठी संजयवर त्याची भिस्त होती; पण त्याच्या अकाली निधनाने त्याचा मोठा आधारच गेला! आपल्या मागे त्याला आपल्या सत्तेचा वारस करण्याचे त्यांनी आखलेले सारे मनोरथ ढासळले! घराण्याकडेच सत्तेचा वारसा टिकविण्याचे मनसुबे त्यानी सोडावे असा याचा अर्थ नाही; पण त्यासाठी पुन. नव्याने तयारी करावी लागणार होती, त्यासाठी अवधी हवा होता.

१९७१–७२ ची काँग्रेस आणि १९८०ची इंदिरा काँग्रेस याच्या स्वरूपात, रचनेत फरक होता. संजयचा प्रभावी गट १९८० च्या इंदिरा काँग्रेसमध्ये निर्माण झाला होता. सजयनंतर आपले भवितव्य काय अशी चिंता या गटास वाटणे स्वाभाविक होते. सजयचा वारस कोण, मेनका की राजीव ? एका गटाने मेनकाचे नाव पुढे दामटले, संजयची तडफ मेनकामध्ये आहे असे या गटाचे म्हणणे होते; पण मेनका इंदिरा गाधीसारखीच महत्त्वाकाक्षी ! तिचा प्रभाव वाढू देणे त्याना पसत नव्हते. वारसस्पर्धेतून ती मागे पडली आणि मग संजयची जागा राजीवने घ्यावी असा कोरस सर्वत्र सुरू झाला.

संजयच्या काळात त्याच्या गटाचे जे प्रस्थ होते ते इंदिरा गाधीनी बरेच कमी केले आहे. संजय-मित्रानी सजयच्या हयातीत केलेले मोठ्या रकमाचे करार व व्यवहार आता स्थगित झाले आहेत पश्चिम जर्मनीकडून एक पाणबुडी घेण्याबाबत करार झाला होता तो, आता थाबविण्यात आला आहे. तसेच संजयच्या काळात मंजुरी दिली गेलेली पंचतारांकित हॉटेलांची एक योजनाही रद्द झाली आहे 'दि गार्डियन' या ब्रिटिश पत्राच्या वार्ताहराने वर्णन केल्याप्रमाणे 'संजयशी निकटचे संबंध असलेल्या राजकारणी मंडळीना एका रात्रीत आपल्याला आता काही स्थान राहिले नाही असा अनुभव येऊ लागला आहे. इंदिरा गाधीची भेट घेण्यासाठी त्याना तासन्तास तिष्ठत थाबावे लागते आणि तरीही भेट मिळत नाहीच'.

संजयची जागा राजीव घेणार असे दिसू लागताच राजीवची स्तुतिस्तोत्रे सुरू झाली आहेत. राजीवने राजकारणप्रवेश करावा अशी विनंती करणारे निवेदन काही काँग्रेस नेत्यानी काही दिवसापूर्वी इंदिरा गाधीना

सादर केले. त्यात राजीवचे वर्णन 'पवित्र गंगेपेक्षा अधिक पवित्र', 'विवेकानंद, गांधी व नेहरू याचे गुण ज्यात एकवटले आहेत असा नेता' अशा शब्दांनी केले आहे. उगवत्या सूर्याची स्तोत्रे गाण्याची याप्रमाणे लाचार स्पर्धा सुरू झाली. राजीव गांधी-जयंतीच्या मुहूर्तावर राजकारणप्रवेश करणार अशा बातम्या होत्या; पण त्या काही खऱ्या ठरल्या नाहीत. राजकारणप्रवेशाऐवजी हैदराबादला बोइंग विमानाच्या अभ्यासक्रमासाठी त्याने प्रवेश घेतला. त्याच्या राजकारण प्रवेशाबाबत इंदिरा गांधीनाही तातडी दिसत नाही.

'जे सरकार चालवू शकतील अशांनाच निवडा' अशी घोषणा देऊन इंदिरा गांधी सत्तेवर आल्या; पण गेल्या नऊ महिन्यात सरकारच्या नाकर्तेपणाचेच दर्शन घडले आहे. यातून मार्ग काय? पुन: आणीबाणी आणायची? की सर्व आजी-माजी काँग्रेस कार्यकर्त्यांना एकत्र आणून नेहरूंच्या काळासारखा प्रबळ काँग्रेस पक्ष पुन: उभारावयाचा? दोन्ही पर्यायांची चाचपणी इंदिरा गांधी करीत असाव्यात असे दिसते. केंद्रीय मंत्रिमंडळाची पुनर्घटना लावणीवर पडली आहे. सुब्रह्मण्यम्, जगजीवनराम, यशवंतराव चव्हाण याना मंत्रिमंडळात घेण्याचा त्यांचा मनसुवा आहे काय? आणि हे नेते मंत्रिपद स्वीकारण्यास तयार होतील काय? इंदिरा गांधीच्या एकाधिकारशाही प्रवृत्तीत व कार्यपद्धतीत काही बदल झाला नसताना त्यांनी तसे करणे कितपत योग्य होईल? देशापुढील प्रश्न सोडवण्यात आपल्याला अपयश आले तर जनता पुन: आपल्यापासून दूर जाईल याची इंदिरा गांधीनाही कल्पना आहे. सर्व नव्या-जुन्या काँग्रेसजनाना एकत्र आणण्याचे विचाराकडे त्यातूनच त्या प्रवृत्त झाल्या असण्याची शक्यता आहे. हा विचार त्यांनी उघडपणे बोलून दाखविलेला नाही आणि त्याला यश येण्याची शक्यता नसेल तर त्या त्याबद्दल उघड बोलणारही नाहीत. सध्या चालू आहे फक्त चाचपणी! अरस काँग्रेस या जाळयात फसेल काय? काही दिवसांतच यासंबंधीचे चित्र स्पष्ट होईल.

□

## औरंगाबाद वार्ता

# ५।१० टक्के प्राध्यापकच अभ्यासू आणि मेहनती असतात

## –डॉ. भोसले, कुलगुरु मराठवाडा विद्यापीठ

"भोसले हे असे कुलगुरु आहेत की, ते असले काय आणि नसले काय, कुणाला फारसं दुखवायचं नाही आणि कधी एखादा धडाकेबाज कार्यक्रमही अंमलात आणायचा नाही, त्याचं अस्तित्व कधी जाणवतच नाही–" मराठा-विद्यापीठातले एक जाणकार सांगत होते 'सायबांचं म्हणजे असं आहे की जर का तुमचं काम नियमात असल तर ते हुनार–पण तसंमग ते तुमची दखल घेनार नाहीत!' विद्यापीठातला एक सामान्य कर्मचारी सांगत होता आणि या दोन्ही प्रतिक्रिया काही अनपेक्षित नाहीत.

डॉ. भोसले हे गणिताचे अभ्यासक आहेत. त्यामुळं प्रत्येक गोष्ट त्यानी तोलून–मापून सावधपणे केली तर त्यात नवल नाही. कुलगुरुपदावर त्यांची तीन वर्षांसाठी फेरनियुक्ती झाली म्हणून मुलाखतीला गेलो तेव्हा हाच अनुभव आला.

नियुक्तीचं पत्र आणि ऑर्डर आली होती त्यामुळे पेढयानी स्वागत झालं. नंतर जवळजवळ दोन तास उलटसुलट प्रश्न विचारले. माझे प्रश्न मराठीत आणि त्यांची उत्तरं हिंदीमिश्रित मराठीत किंवा इंग्लिशमध्ये श्री. भोसले हे बराच काळ मध्यप्रदेशात होते त्यामुळे बोलताना हिंदीचा प्रभाव जाणवतो. तर ही जी काहीशी अळणी मुलाखत झाली ती अशी– (उत्तरं अर्थातच माझ्या शब्दात देत आहे.)

**: कुलगुरुपदाची जबाबदारी आणि त्याबरोबर येणाऱ्या कटकटी यापेक्षा शांतपणे गणिताचं संशोधन करावं असं वाटत नाही का?**

: हाच प्रश्न मला एका अमेरिकन पत्रकारांच्या गटानं विचारला होता. कुलगुरुपदाची जबाबदारी आणि त्रास मोठा आहे; पण त्याचे काही फायदेही आहेत. या पदामुळेच मला समाजात वेगवेगळया ठिकाणी जाता येतं, विविध लोकांना भेटता येतं. मी नुसता गणिताचा प्राध्यापक राहिलो असतो तर हे शक्य नव्हतं. मग कुणीच माझ्याकडे आलं नसतं!'

: कुलगुरूचं पद हे नुसतं शोभेचं आहे की काही अधिकाराचं ते पद आहे?

: कुलगुरूला जर कार्यकारिणीचा एकमुखी पाठिंबा असेल तर खूप काही करता येण्याजोगं आहे; पण कार्यकारिणी जर अनुकूल नसेल तर फारसं काही करता येत नाही. अगदीच एखादं तातडीचं प्रकरण असेल तर सेक्शन ११.४ चा वापर करता येतो; पण सर्वसाधारण परिस्थितीत कार्यकारिणीच्या पाठिंब्याशिवाय निर्णय घेता येत नाहीत.

: तुमचे आणि कार्यकारिणीचे संबंध कसे होते?

: असं आहे, चार प्रकारची चार माणसं असतात. आपण सहन करायला पाहिजे. कुलगुरूमध्ये प्रचंड सहनशीलता असावी लागते आणि मी माझं मन नेहमी उघडं ठेवतो. सुरुवातीला माझी भूमिका जरी आग्रही असली तरी नतर बहुमताचा कल पाहून मी त्यात बदल करतो आणि सगळे निर्णय कार्यकारिणीच्या मतानंच घेतो. मला अडथळे आले; पण तरीही यश मिळालं!

: कोणते अडथळे आले?

: इथं रजिस्ट्रारच नव्हता. एक–दीड वर्ष झालं, रजिस्ट्रार नाही. सध्याचे रजिस्ट्रारसुद्धा तात्पुरत्या नेमणुकीवरचे आहेत.

: रजिस्ट्रार हा I. A. S. अधिकारी असावा अशी मागणी झाली आहे, तुम्हाला त्याबाबत काय वाटतं? I. A. S. अधिकारी हा नोकरशाही वृत्तीनं काम करणारा. ही वृत्ती विद्यापीठात यावी असं वाटतं का?

: रजिस्ट्रार I. A. S. अधिकारी आहे की दुसरा कोणी आहे यापेक्षा तो माणूस कसा आहे हे महत्त्वाचं आहे आणि नोकरशाही वृत्ती म्हणजे काय? नियमाविरुद्ध

जाऊन कसं चालेल ? कोणताही निर्णय घेतला तरी त्यामुळे कुणी ना कुणी तरी दुखावणारच मग तो वर तक्रार घेऊन जाणार. तुम्ही जर नियमात न बसणारी गोष्ट केली तर त्याचं समर्थन कसं करणार ?

: हल्ली प्रत्येक विद्यापीठात ८०० ते १००० निवडणुका होतात. ह्याचा काही अडथळा होतो का ?

: त्यावाबत सरकार काय ते ठरवतं. विधानसभेत त्याचे निर्णय होतात.

: मराठवाड्यातली बहुसंख्य महाविद्यालयं ही रडतखडत जगत आहेत, त्याची आर्थिक परिस्थिती फारच नाजूक आहे. विद्यापीठ याबाबत काय करत ?

: आम्ही सरकारकडे शिष्टमंडळं घेऊन जातो आणि ही महाविद्यालयं बंद करू नयेत अशी विनती करतो.

: पण काही काही महाविद्यालयात तर जेमतेम १०० विद्यार्थीच आहेत.

: तरीही आमचं सरकारला असं सागणं असतं की, या १०० मुलाना शिक्षणाची संधी का नाकारायची ? हे काही दुकान नाही. प्रत्येक वेळी तात्पुरत्या फायद्याचा विचार करून चालत नाही. कमी मुलं असली तरी केवळ तेवढ्यासाठी ते कॉलेज बंद करू नये. अर्थात मुलं कमी असली की, प्राध्यापकांनी त्याच्याकडे जास्त लक्ष द्यावं अशी माझी अपेक्षा आहे. मुलं कमी असली तरी End product हे जास्तीत जास्त चागल कसं बाहेर पडेल याकडे प्राध्यापकांनी लक्ष दिलं पाहिजे; पण फक्त ५–१० टक्के प्राध्यापकच अभ्यासू आणि मेहनती असतात. पुस्तकं घ्यायला आमच्याकडे पैसे नाहीत असं सांगतात. मी म्हणतो तुमच्याकडे स्कूटर आहे, रेडिओ आहे, टेरिलिन-टेरिकॉटचे कपडे आहेत. मग पुस्तकं घ्यायलाच पैसे कसे नसतात ? मी स्वत: साधा लेक्चरर होतो तेव्हाही माझ्या पगारापैकी बराच भाग पुस्तकावर खर्च करत असे.

: मराठवाडा विद्यापीठातला विद्यार्थी आणि पुण्यामुबईकडला विद्यार्थी यात कोणता फरक जाणवतो ?

: इथला विद्यार्थी जास्त साधा, सिंपल आहे. पुण्या-मुबईकडे सोफिस्टिकेशन जास्त आहे; पण इथला विद्यार्थी बुद्धिमत्तेबाबत मुळीच मागे नाही. अर्थात काही मुलं बाहेरचं राजकारण इथं आणायचा प्रयत्न करतात; पण ती लगेच लक्षात येतात. एकंदरीत विद्यार्थी शात आहेत.

: मराठवाडा विद्यापीठात वसतिगृहाची फार मोठी अडचण आहे. त्याबाबत काय वाटतं ?

: जास्त सोयी करायचे प्रयत्न चालू आहेत; पण पैसे कमी पडतात आणि मिळाले तरी फार उशीरा मिळतात. सुरुवातीला २ लाखात एखादं काम होईल अशा अंदाजानं पैसे मागितले तर प्रत्यक्ष पैसे हाती येईपर्यंत त्याच कामासाठी तीन लाख रुपयाची आवश्यकता असते आणि फार मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी-वसतिगृहं झाली तर ती कटकटीची केंद्रं होतात. जबलपूरच्या इंजिनिअरिंग कॉलेजचं उदाहरण पाहा तिथले विद्यार्थी अगदी साधे शात होते; पण त्यानी सुमारे १५०० विद्यार्थ्यांचं वसतिगृह तयार केलं आणि जरा काही झालं की, तिथं कटकटी होऊ लागल्या. बनारस हिंदु विश्वविद्यालय म्हणजे तर एक छोटं नगरच आहे. तिथं कॅम्पसवर ५० हजार विद्यार्थी राहतात. दोन हजार प्राध्यापक आहेत तिथं; पण इतक्या मोठ्या सख्येनं विद्यार्थी एकत्र असल्यामुळं सारखा काही ना काही त्रास असतो. मध्यंतरी तर तिथं कुलगुरु म्हणून जायला कुणीच तयार होत नव्हतं !

: पण तरीही विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय व्हायला हवीच.

: अर्थातच, त्या दृष्टीनं प्रयत्न चालू आहेत. विद्यार्थिनीच्या सध्याच्या वसतिगृहाचा विस्तार करणार आहोत; पण गरजेच्या मानान पैसा कमी पडतो अमेरिकेत विद्यापीठाना मोठ्या देणग्या मिळतात. मुबईतही टाटानी दोन लाखाची देणगी तिथल्या विद्यापीठाला दिली आहे. इथं कोण देणार ?

: आपल्या विद्यापीठातनं Internal Assessment ची पद्धत (अतर्गत चाचणी) काढून टाकली आहे. वास्तविक तो तर सत्रपद्धतीचा प्राण आहे. आपलं मत काय आहे ?

: अकॅडेमिक कौन्सिलनी बहुमतान तो निर्णय घेतला. विद्यार्थ्यांना भरमसाठ मार्क पडायचे, अनेक तक्रारी येत होत्या आणि त्याबाबत आम्हाला काहीच करता येत नसे.

: मराठवाड्याच्या प्रश्नाशी निगडित असं काही संशोधन विद्यापीठानं करायला नको का ? नामातराच्या प्रश्नासंबंधी पुणे विद्यापीठाच्या सहकार्यानं काही पाहणी करण्यात येत आहे. असंच काही या विद्या-


## नवीन दाखल झालेली पुस्तके

१. मनोरुग्ण व्यथा आणि कथा – मालतीबाई रानडे
२. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर ह्यांचे वाङ्मयविषयक लेख –संपादक : ग. दे. खानोलकर
३. फिल्लमबाजी – शिरीष कणेकर
४. लंडनची पत्रे – प्रा. ना. ल. वैद्य
५. टिळक आणि आगरकर – ( नाटक ) – विश्राम बेडेकर

1. **Meetings with Remarkable Men** – ( Philosophy–Picture Story ) G. I. Gurdjieff
2. **The Goebbels Diaries : The Last Days**– Edited and introduced by Hugh Trevor–Roper
3. ***You Must Be Kidding*** – James Hadley Chose
4. **White House Years** – Henry Kissinger
5. **The Establishment** – ( Novel ) – Howard Fast

** The Prices of books have become Prohibitive !*
*Join ' The Phoenix Library ' and save your money !*

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

पीठाला करता येणार नाही का ?

: आम्ही अशा संशोधनाला जरूर परवानगी देऊ; पण तसं सशोधन करायची तयारी कुणी तरी दाखवली पाहिजे

: मराठवाडा विद्यापीठात आता उर्दू, संस्कृत वगैरे नवे विभाग सुरू होत आहेत, त्यात भूगर्भशास्त्र हाही विषय असायला हवा. कारण पिण्याच्या पाण्याचा फार मोठा प्रश्न या भागाला भेडसावतो. त्या क्षेत्रातले तज्ज्ञ इकडे येत नाहीत.

: एखादा विषय असा वरून लादता येत नाही. त्याची वाढ स्वाभाविकपणे व्हायला हवी. महाविद्यालयीन पातळीवर तो आधी शिकवला गेला पाहिजे. विद्यापीठीय शिक्षणाची गरज विकसित झाली पाहिजे. उर्दूची मागणी फार जुनी आहे. या भागात उर्दूचा प्रसारही खूप आहे. तीच गोष्ट पाली आणि बुद्धतत्त्वज्ञानाच्या विभागाची. याचीही इथं मोठी मागणी आहे. संस्कृत तर सर्व भाषाची जननी. त्यामुळे विद्यार्थी कमी झाले तरी त्याचा वेगळा विभाग आवश्यक आहे.

: पदव्युत्तर संशोधनासंबंधी मध्यंतरी काही वाद झाला होता–

: आम्ही आता Ph. D. च्या नोंदणीच्या पद्धतीत बदल केला आहे, पूर्वी म्हणजे जो विद्यार्थी गाईडशी प्रथम संपर्क साधत असे, त्याला संधी मिळायची. नंतर एखादा त्याच्याहून हुशार विद्यार्थी आला तरी त्याला घेतलं जात नसे. आता आम्ही एका विशिष्ट तारखेपर्यंत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवतो, नंतर विभागप्रमुख, मार्गदर्शक या विद्यार्थ्यांची मुलाखत घेतात आणि त्यातून निवड केली जाते.

: या विद्यापीठातलं प्रशासन फार दुबळं आहे. कारभार गलथान आहे असं म्हणतात ते खरं का ?

: पुण्यामुंबईला तर आमच्यापेक्षा जास्त खराब परिस्थिती आहे. त्यांच्याकडे तीन-तीन महिने परीक्षा पुढं ढकलल्या जातात. आमच्याकडे ७ दिवसाहून जास्त परीक्षा लांबत नाही आणि परीक्षा पुढं ढकलली तरी आम्ही मधल्या सुट्टया रद्द करतो. त्यामुळे परीक्षा उशीरा सुरू झाली तरी वेळेवर संपते. सुरुवातीला मी परीक्षा एक दिवसही पुढं ढकलायची नाही असं ठरवलं होतं; पण मग मी जिथं जाईन तिथं मुलं घेराव घालायची, मग पोलिसाना बोलवायला लागायचं. सारखा एक पोलीस बरोबर असायचा. ती कटकट करण्यापेक्षा परीक्षा थोडी पुढं ढकलणं चांगलं असं मला वाटलं.

: ग्रंथालयात पुस्तकं खूप उशीरा येतात त्यासंबंधी काय करता येईल ?

: पुस्तकासाठी त्या त्या विभागाकडून मागणी व्हायली हवी. मग त्याचं कोटेशन मागवणं, त्याला मजुरी देणं वगैरे पद्धत असते. या सगळ्याला वेळ लागतो. आपण खाजगी खरेदी करतो तशी विद्यापीठात करता येणार नाही.

अशा तऱ्हेनं दोन तास अनेक प्रकारानं प्रयत्न करूनही हाती फारसा ममाला लागला नाही डॉ. ब. रा. भोसले म्हणजे पत्रकाराच्या दृष्टीनं एक अवघड गणित आहे ! वास्तविक नामांतरासंबंधीच्या प्रश्नाचं पिल्लू हळूच सोडून द्यायचा माझा विचार होता; पण एकंदर मुलाखतच इतकी सावध, सपक होती की नामांतराचा प्रश्न काढावासाच वाटला नाही. तसा धीरच झाला नाही ! शेवटी तो प्रश्न न विचारताच मुलाखत आटोपती घेतली !

नंतर श्री. भोसले यांच्या गेल्या तीन वर्षांच्या कारकीर्दीसंबंधीचा एक लेख मला देण्यात आला. नाटयशास्त्र आणि वृत्तपत्रविद्या या दोन विभागाची घडी नीट बसवणं, महाविद्यालयांचा संपर्क विद्यापीठ अनुदान मंडळ, राज्यशासन आणि मराठवाडा विद्यापीठ या तीन संस्थाशी सुलभ व्हावा म्हणून 'महाविद्यालय विकास मंडळ' स्थापन करणं, काही इमारतींचं बांधकाम इत्यादी तपशील त्यात देण्यात आला आहे.

**–भालचंद्र जोशी**

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. प. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# साईबाबांच्या तसबिरीतून निघणारी विभूती

**डॉ. शरद अभ्यंकर**

एखाद्या दैवताच्या तसबिरीतून अंगारा काढण्याचा चमत्कार करणं हा बुवाबाजीच्या क्षेत्रातील एक हातखंडा प्रयोग ! कोलंबो येथे राहणाऱ्या सी. कार्तिगेसन या धनवान सद्गृहस्थाच्या घरी अशाच तऱ्हेने श्रीसाईबाबाच्या तसबिरीमधून विभूती निघण्याचा प्रकार घडू लागला आणि भक्तगणाची दर्शनासाठी गर्दी लोटली. श्रीलंका रॅशनालिस्टस् असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अब्राहम टी. कोवूर याच्या कानावर ही हकीकत गेल्यावर त्यानी श्री. कार्तिगेसन याच्याशी पत्रव्यवहार सुरू केला डॉ. कोवूर व श्री कार्तिगेसन याच्यामध्ये झालेला हा पत्रव्यवहार वाचनीय व उद्‌बोधक आहे.

एकदा लाल फर्नांडो हे माझे मित्र मला भेटायला आले आणि त्यानी सांगितले की, कोलंबोमधील एका धनवान हिंदू गृहस्थाचे घरी सत्यसाईबाबाचे फोटोतून विभूती पडण्याचा चमत्कार घडत आहे. हा चमत्कार पहायला ते स्वत: गेले होते आणि या विभूतीचा नमुनाही त्यांनी दाखवायला आणला होता. या गृहस्थाना मी एक पत्र पाठवले. त्यातून उद्‌भवलेला हा पत्रव्यवहार.

२९–७–७७

श्री. सी. कार्तिगेसन,
प्रिय महाशय–

आपल्या घरातील साईबाबाच्या तसबिरीतून विभूती पडण्याचा चमत्कार घडत आहे असे मी ऐकले. अशा पद्धतीच्या चमत्काराचा अभ्यास करण्याचा माझा प्रयत्न असतो. त्यामुळे या चमत्काराचा शोध घेण्याची संधी आपण मला देऊ शकाल काय ?

आपला सत्यशोधक
अब्राहम टी कोवूर
¤

२ ऑगस्ट १९७७

डॉ. अब्राहम टी. कोवूर
अध्यक्ष, श्री. लंका रॅशनॅलिस्ट असोसिएशन
कोलंबो.

प्रिय महाशय,

आपल्या २९ जुलैच्या पत्राला उत्तर म्हणून मी असे सांगू इच्छितो की, माझ्या घरातील सत्यसाईबाबाच्या फोटोतून विभूती पडत आहे, ही गोष्ट खरी आहे.

या चमत्काराचा शोध आपण कोणत्या पद्धतीने घेणार आहा, याची मला कल्पना नाही; पण तुमचे एक मित्र, श्री. लाल फर्नांडो यांनी या तसबिरीमागे एखादी अंगाऱ्याची पिशवी लपविली आहे काय हे पहाण्यासाठी तसबीर उचकटून पहाण्याची मागणी केली. तसेच काही आपण करणार असाल तर मात्र माझी त्या गोष्टीला अजिबात संमति नाही.

हा चमत्कार आणि त्याच्यासारख्याच आणखी एक दोन गोष्टी या माझ्या पत्नीच्या व्यक्तिगत बाबी आहेत बंगलोर येथील आश्रमात ती नुकतीच साईबाबाच्या दर्शनाला गेली होती. या तिच्या भेटीपूर्वी आम्ही दोघेही अशा प्रकाराबाबत साशंक असायचे; पण आता मात्र हा आमच्या श्रद्धेचा प्रश्न झाला आहे. इतरांना याची खात्री पटवावी, अथवा कोणाला सत्यसाईबाबांचे भक्त बनवावे असा आमचा अजिबात हेतू नाही

तरीही तुम्हाला ही घटना कशी सुरू झाली आणि चालू आहे हे ऐकण्यात रस असेल, तर आपण अवश्य आमचे घरी यावे. यावयाचे-आधी टेलिफोन करावा

आपला विश्वासू
सी. कार्तिगेसन
¤

१०–८–७७

सी. कार्तिगेसन यास,
प्रिय महाशय,

आपल्या २ ऑगस्टच्या पत्राबद्दल आभार ! मी या बाबतीत विशेष रस घेतला याचे कारण श्री. लाल फर्नांडो हे आपल्या कुटुंबाला चांगले ओळखत असल्यामुळे इथे काही लबाडी असेल असा संशय सुद्धा घेता येणार नाही अशी त्यानी खात्री दिली होती.

अशा तऱ्हेच्या वस्तुनिर्मितीच्या चमत्काराचा शोध घेण्यात मला रस आहे तो ते कसे घडतात हे शोधून काढण्याकरता तशी संधी तुम्ही दिलीत तर मला आनंद वाटेल

आपला सत्यशोधक
अब्राहम कोवूर
¤

डॉ. अब्राहम टी कोवूर, यास १३–८–७७
प्रिय महाशय,

आपले १०–८–७७ चे पत्र मिळाले.

आपण या चमत्काराचा शोध घेऊ इच्छिता याबाबत मी माझ्या २ ऑगस्टच्या पत्रात लिहिले आहे त्यापेक्षा नवीन काहीच लिहिण्यासारखे नाही.

पण ही तसबीर आणि त्यातून निघालेली विभूति पहाण्याची आणि त्याबद्दल माझ्याशी बोलण्याची तसदी तुम्ही घ्यावी किंवा काय हे ठरवण्याच्या दृष्टीने मी काही माहिती देत आहे.

बंगलोर येथील व्हाइटफील्ड, आश्रमाच्या फाटकाबाहेर जो रस्ता आहे त्याच्या कडेलाच असलेल्या एका विक्रेत्याकडून ही तसबीर आम्ही घेतली. त्या वेळी फक्त एक आठवण म्हणून ती घेतली होती आणि त्याच दृष्टीने माझ्या पत्नीच्या कपड्याच्या कपाटाच्या दाराला आतल्या बाजूला ती ठोकण्यात आली. त्यातून काही गूढ घटना घडणार आहेत अशी आम्ही अपेक्षाच केली नव्हती. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी कपाट उघडताच, तसबिरीखाली ३–४ फुटावर दरवाज्याच्या कडावर विभूती पडलेली पाहून आम्हाला आश्चर्य वाटले.

आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण मुद्दा म्हणजे इथे आल्यावर १५ दिवसानी माझी पत्नी आजारी पडली आणि तिला एका रुग्णलयात ठेवावे लागले. त्यानंतर दोन-तीन दिवसानी तिने मला सांगितले, की साईबावा तिच्या स्वप्नात आले होते आणि इतर गोष्टीबरोबरच त्यानी तिला हेही सांगितले की आता त्या तसबिरीतून विभूति पडायची बंद झालेली असेल ! आणि ती घरी परतताच पुन्हा पुन्हा विभूति पडायला सुरुवात होईल. मी घरी आल्यावर कपाट उघडून पाहिले तर खरोखर तसे झालेले होते. त्यानंतर बऱ्याच वेळा मी ही गोष्ट ताडून पाहिली; पण जवळजवळ तीन महिन्यानी माझी पत्नी

परत घरी आली. दुसऱ्या दिवशी सकाळीच पुन्हा विभूति हजर! आमचे अनेक स्नेहीसोबती या प्रकाराने प्रभावित होऊन ही विभूति घरी घेऊन जातात; तरी नवीन नवीन विभूति उद्भवतच रहाते.

आपण या गूढाचा शोध घेऊ पाहात असाल तर मी अवश्य तुमच्याशी सहकार्य करायला तयार आहे; पण आमच्यापुरती तरी ही तसबीर आता श्रद्धास्थान झाल्यामुळे कोणीही त्यावर हात टाकलेला आम्हाला चालणार नाही!

आपला विश्वासू
सी. कार्तिगेसन

¤

गोपनीय २८–८–१९७७

प्रिय श्री. कार्तिगेसन,

आपले १३ तारखेचे पत्र मिळाले. मी स्वत:च आजारी पडल्याने रुग्णालयात होतो. त्यामुळे लवकर उत्तर लिहिता आले नाही.

तुमच्या पत्नीच्या धक्कादायक मानसिक विकृतीकडे तुमचे लक्ष वेधण्यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. दुर्लक्ष केल्यास याची परिणती तुमच्या पत्नीला वेड लागण्यात होईल. मला अशी भीती वाटते की, पोल्टेरगॅस्टिक न्यूरॉसिस या विकाराची ती बळी आहे.

मी शोध घेतलेल्या अशा प्रकारच्या शेकडो हकीकतीच्याप्रमाणेच तुमच्या घरात साईबाबांच्या तसबिरीतून विभूती पडण्याचा जो चमत्कार घडतो, तो तुमच्या पत्नीच्या या विकृतीतून उद्भवणाऱ्या अप्रकट हालचालीमुळेच होय!

काही दिवस ही तसबीर तुम्ही तुमच्या पत्नीपासून लपवून ठेवू शकलात, तर या तथाकथित चमत्कारातील तिचा भाग तुमच्या लक्षात येईल. जर केवळ दयाभावनेने किंवा पावित्र्यभंगाच्या खोट्या भीतीने तुम्ही या प्रकरणाचा समूळ शोध घेण्याची टाळाटाळ कराल, तर तुमच्या निष्काळजीपणाने तुम्ही तिला वेडी होऊ दिलीत असे म्हणावे लागेल.

याबाबतीत माझे साहाय्य आपणास हवे असेल तर कृपया कळवावे.

कृपया मी केलेल्या निदानाची कल्पना तुमच्या पत्नीला देऊ नका. कारण अचानक ही गोष्ट उघडकीला आल्याचे दुष्परिणाम तिच्यावर होण्याची शक्यता आहे.

आपला विश्वासू
अब्राहम टी. कोवूर

¤

६ सप्टेंबर, १९७७

डॉ. अब्राहम टी. कोवूर,

प्रिय महाशय,

आपले २८ ऑगस्टचे पत्र म्हणजे माझा भ्रमनिरास करणारे एक धक्कादायक असेच होते. रॅशनॅलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष या नात्याने माझ्या घरातील 'सत्यसाईबाबांच्या' तसबिरीतून निघणाऱ्या विभूतीच्या चमत्काराची परीक्षा करण्याची संधी देण्याची विनंती तुम्ही केलीत, त्याला प्रतिसाद देताना या अनैसर्गिक घटनेचा, पूर्वग्रहविरहित दृष्टीने शोध घेण्याची तुमची मनापासून इच्छा असावी असे मी समजत होतो; पण असे दिसते की, प्रत्यक्ष परिस्थिती पाहण्याचे आणि या विषयावर माझ्याशी चर्चा करण्याचे माझे निमंत्रण न स्वीकारता माझ्या पत्नीला होत असलेल्या कुठल्या काल्पनिक विकाराचे निदान तुम्ही करायला धजावता आणि तेसुद्धा तिची लक्षणे समजावून घेण्याकरता तिच्याशी अक्षरही न बोलता किंवा तिला न पाहता शिवाय आपले मत वा सल्ला कोणीही विचारलेला नसताना!

व्यवसायनीतीला तर हे सोडून आहेच; पण अतिशय उद्धटपणाचे आहे असे मी समजतो. आपल्या पत्रातला मजकूर बदनामी अथवा अशाच कुठल्या गुन्ह्यात मोडतो काय याबाबत कायदेशीर सल्ला घेण्याचे मी ठरवले आहे.

तुम्हाला आठवत असेलच की, २८ तारखेला टेलिफोन करून तुम्ही मला सांगितलेत की, तुम्ही मला एक पत्र पाठवत असून ते मला दुसऱ्या दिवशी पोचेल आणि माझ्या पत्नीने ते न वाचणे श्रेयस्कर होईल. या पत्रात काय असेल याची कल्पना नसल्यामुळे आणि आपली विनंतीही थोडी विचित्र असल्यामुळे मी तुम्हाला लगेचच सांगितले की, याबाबत मी आताच निश्चित सांगू शकणार नाही. नंतर असे घडले की, ३० ऑगस्टला मी घरात नसताना तुमचे पत्र आले आणि आमच्यापैकी कुणालाही आलेली पत्रे आम्ही दोघांनीही वाचायची ही आमच्या घरची पद्धत असल्यामुळे, मी वाचण्यापूर्वीच माझ्या पत्नीने तुमचे पत्र वाचले होते. इथे देखील आपण दूरदृष्टी न वापरता वागलात. तुमच्या पत्राने तिचा संताप झाला–पहिले कारण म्हणजे तुम्हाला विचारले नसताना तुम्ही आगाऊपणाने व्यक्त केलेले अपमानास्पद मत आणि दुसरे कारण असे की, हा विषय केवळ ती तिच्या कुटुंबापुरताच समजत असल्यामुळे तुमच्याशी या विषयावर पत्रव्यवहार करायला तिचा मला प्रथमपासूनच असणारा विरोध.

'माझा असा विश्वास आहे की, श्रीलंका रॅशनॅलिस्ट असोसिएशनच्या वतीने तुम्ही या विषयावर माझ्याशी पत्रव्यवहार करत असल्याने, हा सगळा पत्रव्यवहार त्या संस्थेच्या सभासदांच्या पुढे ठेवला जाईल आणि विशेषत: आपले शेवटचे पत्र या संस्थेला कितपत भूषणावह आहे हे ठरवण्याची संधी संस्थेच्या सभासदांना दिली जाईल.

आपला विश्वासू
सी. कार्तिगेसन

¤

८–९–७७

श्री. सी. कार्तिगेसन यास,

प्रिय महाशय,

आपले ६ सप्टेंबरचे पत्र पोचले.

आपल्या घरातील साईबाबांच्या तसबिरीतून विभूती निघण्याच्या तथाकथित चमत्काराचे प्रत्यक्ष संशोधन करण्याची मला गरजच वाटली नाही. कारण आपल्या १३ ऑगस्टच्या पत्रातच या प्रकारामागे कोण व्यक्ती असावी ते दर्शविणारी माहिती मला मिळाली. मी केलेल्या सूचनेवरून स्वत:च शोध घेण्याचा शहाणपणा तुम्ही दाखवला असता, तर तुम्हाला सुद्धा सत्य काय आहे ते उमजले असते आणि माझ्या सद्हेतूची तुम्हाला खात्री पटली असती.

मी केवळ तुमच्याकरता पाठवलेले 'गोपनीय' पत्र मी पूर्वसूचना देऊनही आपल्या पत्नीपासून गुप्त ठेवण्याची खबरदारी न घेतल्याबद्दल तुम्हाला स्वत:लाच दोष द्यावा लागेल. आपण म्हणता की, आधी माझ्या आगाऊपणामुळे आणि मग तिने प्रथमपासूनच माझ्याशी या विषयावर पत्रव्यवहार करण्यास विरोध दर्शवला असल्यामुळे तिला संताप आला. यामुळे तर माझ्या निष्कर्षांना बळकटीच मिळाली आहे.

माझ्याविरुद्ध कायदेशीर इलाज करण्याच्या आपल्या कल्पनेचे मी स्वागतच करतो. कृपया ही गोष्ट शक्यतो लवकर करावी, म्हणजे मी या जगातून नाहीसा होण्यापूर्वीच किंवा अगदी अपंग होण्यापूर्वी ही तसबीर तुमच्या पत्नीच्या हस्तक्षेपापासून दूर कोर्टाच्या कस्टडीत ठेवून, तुमच्यासारख्याच अनेक भोळसट लोकांची मला खात्री पटवता येईल की, साईबाबांच्या तसबिरीतून विभूती निघण्याचे सांगितले जाणारे सर्व चमत्कार म्हणजे मनोविकृती असणाऱ्या किंवा लबाडी करणाऱ्यांनीच गुपचूप केलेले उद्योग असतात!

वास्तविक पाहता तुमच्या पत्नीच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये याकरता हा पत्रव्यवहार केवळ तुमच्या आणि माझ्यातच ठेवण्याची माझी इच्छा होती; पण आता तुमच्या इच्छेनुसारच श्रीलंका रॅशनॅलिस्ट असोसिएशनच्या सभासदांच्या पुढे मला हा ठेवणे भाग आहे.

आपला विश्वासू
अब्राहम टी. कोवूर

□




**लेखकाच्या मध्यपूर्वेतील मनमुराद भटकंतीवर व इराणमधील वास्तव्यावर आधारलेली वेगळी लेखमाला**

□

**लेखांक दहावा**

# सर्फराझ, सर्फराझचे वडील व इराज....

इराणी घरगुती पाहुणचार म्हणजे भलताच अफलातून प्रकार! टेबल भरून पदार्थंच पदार्थं. पाहून पोट भरावं ! अजीर्ण देखील व्हावं ! जेवायला आम्ही सगळे मिळून सात-आठ जण; पण कमीत-कमी पंचवीस तीस माणसांना पुरून उरेल इतकं अन्न समोर मांडलेलं. प्रत्येक 'डिश' निरनिराळ्या पद्धतीनं सजवलेली. सर्वांत आश्चर्यकारक खाद्यपदार्थं म्हणजे मलमलच्या कापडासारखा तलम आणि अर्धपारदर्शक 'नान–ए–लिवाश ! '

बाजारात मिळणारा नून–ए–लिवाश अगदीच वेगळा–आपल्या बळगावला किंवा कर्नाटकात मिळणाऱ्या मांड्यासारखा; पण निगोड मांडे कुरकुरीत आणि खुसखुशीत तर हे बाजारू नून–ए–लिवाश पिठूळ आणि वातड. आपल्या येथील पंजाबी ढाब्यावर मिळणारी 'रुमाली रोटी'– इराणमधील रेस्टॉरंटमध्ये मिळणाऱ्या 'लिवाश' मानच्या जवळपासची. फरक इतकाच की, रुमाली रोटी तेलकट आणि 'लिवाश' फुलक्याप्रमाणे कोरडा !

पण सर्फराझच्या घरी जेवणाच्या टेबलावर असलेला 'नून–ए–लिवाश' एकदम खास ! असं म्हणतात की फिरंगी लोकांना शिराझ मध्ये पहिल्या शाहीखान्याच्या वेळी जेव्हा हा नान वाढण्यात आला तेव्हा त्यांना वाटलं की जेवताना तोंड पुसण्यासाठी आपल्याला हातरुमाल देण्यात आला आहे ! कदाचित त्यामुळे अशा प्रकारच्या नानला आपल्याकडे 'रुमाली रोटी' असं नाव पडलं असावं !

नून–ए–लिवाशच्या बाजूला 'आश–ए–मॉस्त' नावाचं दह्यामध्ये शेपू आणि खिम्याचे गोळे घातलेलं 'थंड' सूप होतं. एका मोठ्या पसरट प्लेटमध्ये 'मिर्झा कासिमी' नाव एकदम भारदस्त; पण प्रत्यक्षात जे होतं ते चक्क खानदेशी थाटाचं वांग्याचं भरीत ! नक्षीदार वाडग्यात पंढरपुरी कडव्या वालासारखे पावटे घातलेला 'बागली पुलाव'. मंद पेटलेल्या निखाऱ्यावर भाजलेल्या 'तलंग' कोंबड्यांचे 'जुजे–कबाब', खुसखुशीत खमंग आणि तोंडात टाकताच विरघळणाऱ्या 'कबाब–खुबीदे' च्या सुरळ्यांचा ढीग ! एका भल्यामोठ्या तसराळ्यात 'ग्रीन सॅलड' आणि त्याच्या बाजूला 'सब्जी–

खुर्दान्' नावाचा सुगंधी पालापाचोळा ! 'सब्जी खुर्दान्' ही इराणची स्पेशालिटी ! इतरत्र असला पाला मी कुठेच खाल्ला नाही !

मला जेवणाची जेव्हढी आवड तेव्हढीच स्वयंपाकाची देखील आहे. स्वयंपाकघरात नवनवीन प्रयोग करण्याची मला हौस आहे. सर्फराझच्या घरी टेबलावर माडलेलं हे 'हवाबाण हरडे' ला आमंत्रित करणारं खाद्य बघून प्रत्येक पदार्थाची 'रेसिपी' विचारण्याचा मला प्रचंड मोह झाला आणि त्याच क्षणी 'शल्यानं अवसानघात करावा' त्याप्रमाणे 'हमाम' मधील उस्तादानं माझ्या ओघळणाऱ्या पोटावर चापटी मारून नापसंतिदर्शक हलवलेल्या मानेची आठवण झाली. हा हन्त हन्त...!

व्यायाम करणं, 'डायट' करणं, पोट कमी करणं, आवश्यक होतं ! – नव्हे मी तसा निश्चयच केला होता !! पण 'डायट'च्या दुर्दैवानं, गप्प बसण्यासाठी आवश्यक असलेल्या मुगाचा वारकासा दाणादेखील दृष्टोत्पत्तीस पडत नव्हता. नाइलाजानं 'आलिया भोगासी' म्हणून मी नून – ए – लिवाशच्या तुकड्यावरोवर एक कबाब–खुबीदे उचलला.

## इराज–ॲंटिथिसिस

इस्फहान सोडण्याअगोदर सर्फराझनं जुम्फा येथील आरमानी लोकांनी घरी बनवलेली द्राक्षाची 'वाइन' खरेदी केली होती. वास्तविक शिराझची 'वाइन' प्रसिद्ध ! शिराझवरून 'शेरी' हे नाव ख्यातनाम झालं, पण सर्फराझचं म्हणणं–शिराझची शराब ही हाफीज आणि साआदीच्या कवितेमध्ये आहे, पिण्यासाठी मात्र इस्फहानमधील जुम्फाच्या आरमानी नागरिकांनी बनवलेली शराबच सर्वश्रेष्ठ ! 'होममेड शराबचे' (म्हणजे खोपडी, ठरा, लठ्ठा नव्हे) घुटके घेत मी जुजे–कबाब आणि कबाब खुबीदेचा फडशा पाडत होतो. हैदरीची तर 'लागली समाधी' अशी अवस्था झाली होती.

सर्फराझच्या दोन्ही वहिणी अन्न चिवडून 'बेबख्शीद (excuse–me !) म्हणत अंतर्धान पावल्या. दोघी काहीशा बावरल्यासारख्या दिसत होत्या हे खरं. टेबलभरून जेवणाचे पेदार्थ आणि जेवणारे आम्ही तिघेच ! हैदरी, सर्फराझ आणि मी. मॉंदरजॉन आम्हाला काय हवं नको बघत टेबलाभोवती घुटमळत होती. सर्फराझनं तिला अनेक वेळा बसण्याची विनती केली तरी ती ऐकत नव्हती. सर्फराझचे वडील पक्तीला नव्हते. ते आपल्या खासगी खोलीमध्ये ब्रह्मप्रदर्शिकेच्या सेवेत ! दाढाना सुख देणारे पदार्थ वाइनच्या घोटानं रिचवत मी उदरभरणयज्ञात रमलो होतो.

दिवाणखान्यात कुणाच्या तरी बोलण्याचा आवाज आला आणि पाठोपाठ एक शिडशिडीत बांध्याचा, विशीचा तरुण डायनिंगरूममध्ये दाखल झाला. ज्याला भेटण्याची मला प्रचंड उत्सुकता लागून राहिली होती तोच हा होता–इराज !

टेबलाजवळ येताच इराजनं अतिशय नम्रपणे मला आणि हैदरीला सलाम केला, उशीर झाल्याबद्दल माफी मागितली. त्याच्या हालचालीत एखाद्या वन्यश्वापदाची सहजता होती. बेदरकार पण सावध !

इराज टेबलापाशी आला तसा हातातील घास प्लेटमध्ये ठेवून सर्फराझ उभा राहिला. दोघे भाऊ एकमेकांना कडकडून मिठी मारून भेटले ! जणू राम–भरत–भेट ! दोघे एकमेकाच्या गालाची चुंबनं घेत पुन्हापुन्हा मिठी मारत होते मॉंदरजॉनच्या डोळ्यात पाणी तरारलं होतं–म्हातारीचा ऊर भरून आला होता. दोघी वहिणी स्वयंपाकघराच्या दरवाज्यात बिचकलेल्या हरिणीसारख्या उभ्या होत्या. सर्फराझला देखील दाटून आलं होतं. महत्प्रयासानं तो स्वत वर ताबा ठेवून होता.

इराजच्या चेहऱ्यावर मात्र कसलाच फरक जाणवत नव्हता. त्याचा चेहरा निर्विकार निश्चितच नव्हता; पण 'एक्सप्रेशन्' कंट्रोल म्हणावं अस. सौम्य, मृदु आणि अविचल. सर्फराझचा आवेग त्याला मिठीतून जाणवला असावा. एखाद्या लहान मुलाला 'उगी उगी' करावं त्याप्रमाणे इराज सर्फराझची पाठ थोपटत होता.

सर्फराझला भेटून, मॉंदरजॉनची विचारपूस करून इराज माझ्या बाजूनं वळला. मी खुर्चीतून उठणार इतक्यात त्यान माझ्या खाद्यावर दोन्ही हात ठेवून 'please sit' असं विनवलं सर्फराझनं माझी ओळख करून दिली. इराजनं हस्तादोलनासाठी हात पुढं केला. मी उठून उभ राहात हात पुढं करत हसत म्हणालो,

'जरा सबुरीनं शेकहॅन्ड कर......तू कराटे चॅम्पियन !'

'आगा–ए–विजे–शुभा मेहमान–ए–मॉं' अस काहीसं पुटपुटत इराजनं आपल्या जबरदस्त मजबूत पजात माझा हात पकडला आणि विचारलं–' हाल–ए–शुमाचतोरे–' (हाऊ डू यू डू ?)

'मर्सी, हाल–ए–शुमा चतोरे'–मी जबाब दिला.

'शुमा फार्सी बालदी ऽऽऽ' (तुला फार्सी बोलता येतं ?)

इराजनं काहीसं आश्चर्यानं विचारलं.

'नो–नो–जस्ट सम वर्डस् ' मी झटपट कबुली दिली.

इराज हैदरीची विचारपूस करू लागला तेव्हा मॉंदरजॉन त्याच्यासाठी टेबलावर जागा करू लागली. फरिश्तेनं झटपट प्लेट, बाउल् वगैरे आणून ठेवल. हैदरीशी बोलत, उभ्या उभ्या नून-ए-लिवाशच्या तुकड्यावर सब्जी खुर्दान आणि कबाब–खुबीदे ठेवून 'आगा-ए-विजेइन् सॅंडविच इरुणी' म्हणत प्रसन्न हसत इराज खुर्चीत बसला.

माझी व्होडका आणि वाइन बरीच उतरली होती. मी कल्पनेनं चितारलेल्या इराजपेक्षा हा इराज अगदीच वेगळा होता !

'भेटला तर ?'–भेटल्यानंतर बोलला तर ? वगैरे जे उद्‌गार सर्फराजनं काढले होते त्यावरून मी एका मिजासखोर, उर्मट, तुसड्या ॲंग्री यंग मॅनला भेटण्याच्या तयारीत होतो; पण हा उमदा तरुण तर माझ्या कल्पनेतील इराजचा ॲंटीथिसिस होता निदान प्रथमदर्शनी तरी मला तसं वाटलं. हा तथाकथित ॲंग्री यंग मॅन भेटला होता इतकंच नव्हे तर बोलला देखील होता !

पण हा खरच भेटला होता का ? खरंच बोलत होता का ? निश्चित उत्तर देणं कठीण होतं.

इराजनं एक साधी टेरीकॉटची किरमजी रंगाची पॅंट पेहनली होती. अगात काहीसा मळलेला सफेद टी शर्ट. चेहरा अतिशय रेखीव आणि कोरीव–कोवळेपणाला एक मर्दानी झाक. त्याच्या सर्व हालचाली विवळ्या वाघासारख्या होत्या–लयदार ! संथ पण रुबाबदार !! प्रत्येक हालचालीत विलक्षण सहजता–एखाद्या बॅले डान्सरसारखी ! डोळे, अतिशय पाणीदार, त्यांच्यातील भाव काहीसे गूढ पण निर्मळ आणि निर्व्याज! ह्या उमद्या तरुणाबद्दल सर्फराझनं भेटेल

का ?–भेटला तर बोलेल का ? असे उद्‌गार का काढावेत ह्याचं मला कोडं पडलं होतं

इराज जेवत होता तेव्हा समाधिस्थ असल्याप्रमाणे भासत होता. मॉंदरजॉन त्याच्या खुर्चीमागे उभी होती–खूपच 'टेन्स्' स्वयंपाकघराच्या दरवाज्यात बहिणी दिसत नव्हत्या. नजर खाली वळवून इराज शांतपणे चवीनं जेवत होता. सर्फराझ त्याला अनेक प्रश्न विचारत होता. इराज फक्त हो किंवा नाही एव्हढाच जबाब देत होता. वातावरण विनाकारणच तंग झाल्यासारखं वाटत होत. हैदरी केव्हाच गुपचुप जेवण आटोपून नाहीसा झाला होता. मी जुजेकबाब संपवून, नून-ए-लिवाश रुमालाला बोट पुसून वाइनचे घुटके घेत बसून होतो. मला सिगरेट पेटवायची जबर इच्छा झाली. इराजला ती कळली. त्यान चटकन उठून माझ्यासमोर अॅशट्रे ठेवली आणि पुन्हा सर्फराझच्या प्रश्नाला 'हो', 'नाही' उत्तर देत तो सथपणे जेवू लागला सर्फराझचे सलामीचे बहुतेक सर्व प्रश्न संपले तेव्हा मी उत्सुकता लपवत सवाल केला–

## जंगलातील चित्ता

'इराज, सकाळी युनिर्व्हर्सिटीमध्ये दंगल झाली, गोळीबार झाला हे खरं का ?–काहीजण गोळीबारात मरण पावले म्हणतात–दंगा कशामुळे झाला ?

जंगलातील चित्ता धोक्याची किंवा सावजाची चाहूल लागताच जसा एकदम सावध होतो, अलर्ट होतो त्याप्रमाणे इराजची प्रतिक्रिया झाली. त्याच्या पोलादाच्या काबीप्रमाणे असलेल्या शरीरातील प्रत्येक स्नायू हुकमाची तावेदारी करण्यासाठी सज्ज झाला. वीतभर दिसणारी त्याची छाती नागाच्या फण्याप्रमाणे प्रसरण पावली मला वाटलं त्याच्या अंगातील टीशर्ट आता फाटणार ! कुठल्याही क्षणी साक्षात मृत्यू इराजच्या रूपानं झेपावला असता–हे रौद्ररूपाच प्रदर्शन नव्हत–माणसात खोल दडलेलं श्वापद एकाएकी जागं होऊ पहात होतं. जागं झालं होतं निमिषमात्रच मी मृत्यूच दर्शन घेतलं, क्षणार्धात 'इराज रिलॅक्स' झाला. समाधिस्थ झाला ! बाऊलमधील सॅलॅडची एकदोन पानं उचलून घेत माझ्याकडं मान वर करून पहात माझ्या डोळ्याला डोळा भिडवून त्यानं सर्फराझला उद्देशून प्रश्न केला–

'तुम्हाला कसं कळलं ?'

सर्फराझनं पेल्यातील वाइन घटाघटा संपवली ग्लास पुन्हा भरत, घसा खाकरत तो म्हणाला,

'वाटेत भेटलेल्या एका ट्रकड्रायव्हरनं सांगितल ! '

इराजन वाइनची बाटली उचलली माझा ग्लास भरत तो म्हणाला–

'दंगा बाझार त झाला. युनिर्व्हर्सिटीमध्ये नाही.'

'तू घेत नाहीस थोडी वाइन ?' मी प्रश्न केला.

'Never !'

आणि आपण कदाचित फार कटू आणि उर्मट उत्तर दिलं असं वाटायला नको म्हणून हसत इराज म्हणाला–

'मला आवडत नाही. मी एकदोन वेळा घेऊन पाहिली आहे... बियर, व्होडका–शराब–पण मला आवडत नाही ! गांजा हशहीशसुद्धा मी ओढून बघितलय–अफीमसुद्धा–पण मला आवडतच नाही !'

'–कराटेचा अभ्यास करतोस म्हणून ?' मी विचारलं.

इराज काहीच बोलला नाही. त्याच्या शांततेत पूर्णविराम सामावला होता, माझ्या 'फालतू' प्रश्नाना उत्तर देण्याची त्याची तयारी नसावी. तो शांतपणे जेवत राहिला. त्याच्या लयबद्ध हालचालीत एक विलक्षण जरब होती. काही क्षणापूर्वी एखाद्या 'किंग कोब्रा'-प्रमाणे तो दंश करायला 'तयार' झाला होता–चित्त्याप्रमाणे हमला करण्याचा त्यानं पवित्रा घेतला होता; पण स्वत च्या सर्व भावना काबूत आणून क्षणार्धात तो 'रिलॅक्स' झाल्याच अद्‌भुत नाटच मी पाहिलं होत, अनभवल होत आणि आता माझ्या शेवटच्या प्रश्नाची अजिबात दखल न घेता त्यानं एक गूढ शांतता निर्माण केली होती, This young man was not only extremely sure of himself he was uniquely capable of controlling the situation and direct it according to his will–

वातावरणात प्रचंड ताण निर्माण झाला होता, इराज दिसत होता तसा नव्हता. त्याची आत्मिक शक्ती जबरदस्त होती–he had a strange impregnable magnetic force around himself–सर्फराझनं त्याच्याबद्दल जे उद्‌गार काढले होते त्यात काही तरी तथ्य असाव अस मला वाटू लागल.

म्हाताऱ्या मॉंदरजॉनला टेबलाभोवतीची विचित्र शांतता अजिबात आवडली नसावी. कदाचित तिनं असे अनेक प्रसंग ह्यापूर्वी अनुभवले असावेत ! आमच जेवण आटोपल होत–

'मी कॉफी करून आणते–शिरिनी (गोल्ड पदार्थ) आणते.

–बसा–उठू नका !'–

अस म्हणत मॉंदरजॉन स्वयपाकघरात गेली. इराज उठला. टेबलावरील प्लेटी, खरकट, भाडी आवरू लागला. त्याला मदत करता करता सर्फराझ म्हणाला–

'आगा- ए-विजे, हा इराज एकदम दिवुने आहे, मॅड, एक नंबरचा चक्रम !– हुषार आहे– खूपच हुषार ! आम्ही सगळे सांगतोय, पुढच्या वर्षी अमेरिकेला जा; पण हा ऐकत नाही! अमेरिकेबद्दल ह्याच्या मनात प्रचड तिरस्कार! मला हा बाटगा म्हणतो !– बरं, अमेरिका नको तर नको युरोपमध्ये जा !– फ्रान्स, जर्मनी–इग्लंड, हा परदेशी शिकून आला तर इराणमध्ये त्याला वाटेल ते करण्यासारख आहे. बघता बघता ह्याची करीअर होईल; पण हा ऐकतच नाही ! कुठच जायला हा तयार नाही. वेडा आहे आपली करिअर बरबाद करणार !– अरे, हा इंग्लिश बऱ्यापैकी बोलतो, जाणतो; पण मुद्दाम हट्टानं बोलणार नाही ! तुझ्याशीच हा प्रथम इग्लिश बोलला असावा ! मी तरी आजपर्यंत कुठल्याही फॉरेनरशी ह्याला इंग्लिश बोलताना ऐकलं नाही. समजून देखील न समजल्यासारखं करण्याची ह्याला सवय ! He hates English language–ह्याचं सगळंच विचित्र आहे !'

इराजकडे बघत खेदानं मान हलवत सर्फराझ प्लेटीचा ढिगारा घेऊन आत गेला. टेबलावर सांडलेलं खरकटं निपटून घेत इराज म्हणाला–

'खरं सांगू, मला विलायतेला जायच अजिबात आकर्षण नाही ! 'अंग्लेसी' भाषेबद्दल मला अजिबात राग नाही. मी अंग्लेसी पढतो;' पण जरूर नसताना ही भाषा बोलायला मला आवडत नाही. आमच्याकडे इंग्लिश बोलणं ही फॅशन झाली आहे मला त्याचा

तिटकारा आहे! आगा- ए विजे, तू फॉरेनर असलास तरी आमचा मेहमान आहेस म्हणून मी तुझ्याकडे इग्लिश बोललो. कारण तुला फार्शी येत नाही; पण तू फार्शी शीक. नाही तर मी हिंदी शिकेन म्हणजे आपल्याला भलत्याच भाषेत एकमेकाशी बोलायला नको!'

शातपणे टेब आवरत, रुमालानं हात पुसत इराज म्हणाला–

'मी गेलोच तर हिंदमध्ये जाईन! तिथं 'पुने' इथ माझे काही दोस्त आहेत. त्याना पुने खूप खूप आवडलेलं दिसतंय. हवा उत्तम, खूप सायकली, खैली खैली अरजून (स्वस्त)– माझे दोस्त म्हणतात एक 'रुपिया'ला सहा 'मौज' (केळी) मिळतात– इथं दोन तुमानला (अडीच रुपये) एक 'मौज!'–पुनेची माणसं मात्र विचित्र आहेत म्हणे! आमच्या इस्फाहिन्याप्रमाणे महाचिक्कू– आणि गचाळ, उद्धट आणि सशयी– पण वातावरण एकदम मोकळं! मन वाटेल ते करावं. मी गेलो तर 'पुने' ला जाईन! – आगा-ए विजे, तुला पुनेबद्दल माहिती आहे?'

'पुने'च्या सदाशिवपेठी'रहिवाश्यांची इराणी विद्यार्थ्यांबद्दलची मतं मला माहीत होती. मी इराजला म्हणाली–

'इराज, तू पुण्याला अवश्य जा; पण तुम्हा इराणी लोकांबद्दल 'पुने' च्या माणसाचं मत मात्र एकदम बेकार आहे! तुमच्यातील अनेक फालतू पोरं तिथं अभ्यासाचं निमित्त करून केवळ मजा करायला आली आहेत...तुमचा शहेनशहा, तुम्ही परदेशात शिकायला गेलात की तुम्हाला भरपूर स्कॉलरशिप देतो. त्या पैशाचा मात्र तुम्ही दुरुपयोग करता असं दिसतय–'

–मी आणखीनही काही त्याला सागणार होतो; पण मोह टाळला. मनात म्हटलं इराजसारखा एक मनस्वी इराणी इंग्लड-अमेरिकेऐवजी हिंदमध्ये पुण्याला येण्याची इच्छा व्यक्त करतो आहे तर त्याला कशाला परावृत्त करा?

–मॉदरजॉननं टेबलावर कॉफी आणून ठेवली. आमच्या गप्पानी अफूसेवनात व्यत्यय येत असल्यामुळे म्हणा किंवा गप्पात सहभागी होण्याची इच्छा झाल्यामुळे म्हणा– सर्फराझचे वडील डायनिंग टेबलापाशी आले. त्याचे डोळे तावरलेले होते. आवाज जड.

आल्या आल्या त्यांनी इराजला काही तरी प्रश्न केला. इतका वेळ स्वत'वर संपूर्ण संयम राखून असलेला इराज– जखमी श्वापदाप्रमाणे खवळून उठला. टेबलावर जोरानं हात आपटून त्यानं आपल्या बापाला धमकीच्या आवाजात काही तरी खरमरीत उत्तर दिलं. मॉदरजॉननं त्याला आवरण्याचा प्रयत्न केला. सर्फराझनं चुचकारण्याचा प्रयत्न केला.

–पण इराजचा स्वत वरचा तावा संपूर्ण सुटला होता. कारण काय असेल ते असो–बापाविषयी त्याच्या मनात मनस्वी तिरस्कार भरला होता एव्हढं खरं. टेबलावर वारंवार हात आपटत इराज गर्जत होता. बापही तितक्याच त्वेषानं प्रत्युत्तरं देत होता. सर्फराझ ओशाळला होता. केविलवाण्या चेहऱ्यानं पडेल आवाजात तो बापलेकांची समजूत काढण्याचा प्रयत्न करत होता.

मी कॉफीचा कप बाजूला सारून उठलो. तोडतल्या तोंडात पुटपुटत सर्वांना 'खुदा हाफीज' केलं– मॉदरजॉननच फक्त डोळ्यानी प्रतिसाद दिला आणि मी खोली गाठली.

–कपडे काढून बिछान्यावर पडलो. मनात विचारांचा नुसता गुता झाला होता. सर्फराझचं घरी रहाण्याचं आमंत्रण स्वीकारून आपण चूक तर केली नाही ना? इराजचा आपल्या वडिलावर इतका राग का? त्याच्या खाजगी गोष्टीबद्दल आपल्या मनात कुतूहल निर्माण होणं योग्य आहे का?

–सर्फराझचे वडील मोठमोठ्यानं आरडाओरडा करत होते. सर्फराझ देखील सतापला होता इराज ताडताड बोलत होता. मधून मधून मॉदरजॉनचे अस्पष्ट हुदके कानावर पडत होते.

– एकाएकी काचा फुटल्याचा आवाज झाला. पाठोपाठ एक खुर्ची किंवा काही तरी भिंतीवर जोरात आदळलं आणि मग काही क्षण स्मशानशातता पसरली. मी ताडकन बिछान्यात उठून बसलो. कसलाच आवाज येत नव्हता. काय झालं असावं? इराजनं बापाला मारलं तर नाही ना? मी प्रचंड अस्वस्थ झालो. खाली जाऊन पहाव का? तसं गेलेलं बरं दिसेल का? पण समजा काही बरवाईट घडलं असेल तर? आपण असं खोलीत बसून राहिलेलं शोभून दिसेल का? सर्फराझच्या घरी राहून आपण उगाचच अडचणीत सापडलो! ह्यापुढे कुणाच्या घरी रहायचं नाही– उलटसुलट विचारानी गोंधळ माजवला होता.

मॉदरजॉनचे हुंदके कानावर पडले जीवघेणी शातता भग पावली मी कानात प्राण ओतून श्वास रोखून ऐकू लागलो. अफीमबाज बाप घोगऱ्या आवाजात काही तरी बोलत होता. त्याच्या आवाजाला एक विचित्र धार होती काय बोलत होता कुणास ठाऊक. स्वर मात्र निर्वाणीचा होता. मॉदरजॉनचे हुंदके थाबले होते. इराज आणि सर्फराझचा अजिबात आवाज नव्हता. बापानं खुदा हाफीज केलं तेव्हा दोन्ही मुलानी प्रत्युत्तर दिलेलं अस्पष्टपणे कानी पडलं.

–बाप आपल्या खोलीत झाला प्रसंग अफूच्या धुंदीत विसरून टाकण्याचा प्रयत्न करीत असावा. सर्फराझ, इराज आपआपल्या खोलीत परतले असावेत. मॉदरजॉन आवरत असलेल्या फुटक्या काचाचा तुटका किणकिणाट वातावरणात घुमघटत फैलावत होता.

माझ्या कपाळावरची तट्ट फुगलेली शीर ताडताड उडत होती. डोकं ठणकत होतं. मी एक सिगरेट पेटवली.

## चार हजार वर्षांपूर्वी

पहाटे लवकरच जाग आली. घरात माणसाची वर्दळ सुरू झाली होती. खोलीतील बसीनमध्ये तोंड धुऊन, दाढी करून, कपडे चढवून मी काहीसा बिचकतच खाली उतरलो. मला सकाळी उठल्याबरोबर आघोळ करायची सवय. त्याशिवाय फ्रेश' वाटतच नाही! पण सर्फराझच्या घरी आघोळ करायची सोय नव्हती.

खाली येऊन दिवाणखान्यात बसलो. दिवाणखाना ठार मोकळा होता. काही वेळानं फरिश्ते आली. गोड हसत 'सलाम' म्हणत तिनं माझ्यासमोर चहा ठेवला. चहापेक्षा तिच्या मनमोकळ्या हसण्यानं एकदम 'ताजगी' आली. रात्रीच्या प्रसगाची छाया पहाटेवर नव्हती! माझ्या मनावरचा ताण एकदम कमी झाला.

मी चहा पीत सर्फराझची वाट पाहत होतो. फरिश्तेनं सांगितल की, तो बाहेर गेलाय आणि नऊ-दहाच्या सुमारास परत येणार आहे. इराजबद्दल विचारण्याचा मला मोह झाला; पण मी गप्प बसून राहिलो. फरिश्तेनं देखील तो विषय टाळला. हुंदरीचा देखील पत्ता

नव्हता. सर्फराझ आणि हैदरी मिळूनच बाहेर गेले असावेत.

मी उठून बगिच्यात फेरफटका मारावा म्हणून व्हराड्यात आलो. दरवाजातच सर्फराझच्या वडलांची गाठ पडली. पहाटेच्या गुलाबी थंडीत ते फिरायला जाऊन आले असावेत. त्याचा चेहरा एकदम प्रसन्न दिसत होता डोळ्याखाली दिसणाऱ्या जाड पिशव्या एवढीच त्याच्या व्यसनाची निशाणी चेहऱ्यावर दिसत होती. रात्रीच्या भाडणाच्या ताणाचा लवलेशही वागण्या-बोलण्यात जाणवत नव्हता.

आम्ही सलामाची देवाणघेवाण केली एकमेकाना 'सुबहा-खैर' करून 'हाल-ए-शुमा चतोरे?' वगैरे प्रश्नोत्तरे पार पाडली आठ-दहा दिवसात मी पंचवीस-तीस फार्सी वाक्ये, पाच-पन्नास शब्द शिकलो होतो. जुजबी सभाषणास तेवढं भाडवल पुरे होतं. अर्थात एकदा हे शब्दभाडवल वापरून संपल्यानतर म त्र अडचण निर्माण व्हायची. माझ फार्सी भाषेच ज्ञान दोन-तीन मिनिटात सपल्याचं सर्फराझच्या वडलाच्या ध्यानात आलं आणि त्यानी आपल्या मोडक्यातोडक्या इग्रजीत सभाषण चालू ठेवल

फरिश्तेनं ब्रेकफास्ट तयार असल्याची खबर दिली आणि आम्ही डायनिंगरूममध्ये गेलो रात्रीचा प्रसग आठवून मला अवघडल्या-सारखं झाल. सर्फराझचे वडील मात्र काहीच झालं नाही इतक्या मोकळेपणानं गप्पा मारीत होते अफूच्या अमलाखाली ते सारं विसरून तर गेले नसतील!

टेबलावर उकडलेली अंडी, पनीर, अड्याचे पोळे, लोणी आणि गरम गरम 'बर्बरी' नान—पण काहीही खाण्याची मला इच्छा नव्हती. सर्फराझच्या वडलाच्या आग्रहाला नम्रतापूर्वक नकार देत मी फक्त कॉफी घेतली सर्फराझचे वडील सागत होते—

'आगा-ए-विजे, तुझं काम संपल की, पर्सिपोलिसला आवश्य जा. पर्सिपोलिस पाहिल्याशिवाय शिराझहून परत जाऊ नको पासारगड पण बघ. तिथं कुरुष-ए-कबीर—(सायरस द ग्रेट)ची समाधी आहे. अगदी साधी. नक्श-ए-रुस्तुम देखील बघण्यासारखं आहे. शिराझमध्ये साआदी आणि हाफीजला पण सलाम करून ये. हाफीजच्या कबरी-कडे उभ राहिल्यानतर त्याचा 'दीवान' हातात घेऊन कुठलही एक पान उघडायच. त्या पानावर आपल्या मनातील प्रश्नाचं नेमकं उत्तर सापडत. तू अवश्य अनुभव घेऊनबघ!'

'मला पर्सिपोलिस बघायची अतिशय उत्सुकता आहे.' गरम गरम कॉफीचे घुटके घेत मी म्हणालो—'मागील वर्षी—१९७१ साली पर्सियनपोलिस इथ इराणी साम्राज्याला अडीच हजार वर्षे पूर्ण झाल्याबद्दलचा जो भव्य सोहळा झाला तो पाहण्यासाठी येण्याची मला खूप इच्छा होती. तेव्हा मी काही कामानिमित्त अगदी जवळच म्हणजे शेजारी अफघानिस्तानमध्ये होतो, पण काबूलमधील काम वेळेत पार पडलं नाही आणि तो भव्य समारंभ पाहण्याचा योग हुकला! मी पर्सिपोलिसबद्दल थोडफार वाचलं आहे...मला कधी-कधी उगाचच वाटतं की, पर्सिपोलीस हे अडीच हजार वर्षांपूर्वीच नसून इ. स. पूर्व अडीच हजार वर्षं इतकं प्राचीन असावं. कमीत कमी चार-साडेचार हजार वर्षांपूर्वीचं ते शहर असावं!'

'पर्सिपोलिसचा निश्चित काळ कोणता ह्याबद्दल आमच्या येथील इतिहासकारात आणि पुरातत्त्ववेत्त्यांमध्ये भिन्न भिन्न मते आहेत.' सर्फराझचे वडील सांगू लागले—'हल्लीच्या काही उत्खननात तर सहा-सात हजार वर्षांपूर्वीच्या संस्कृतीचे पुरावे इराणमध्ये सापडले आहेत. दुर्दैवानं पुरवस्तुसंशोधनाची आमची साधनं अपुरी पड-तात त्यासाठी पाश्चात्याच्या विज्ञानावर आम्हाला अवलंबून राहावं लागत. त्यामुळ एखाद्या गोष्टीचा ते अर्थ लावतील तो मान्य कर-ण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असते. अनेक वेळा हे पाश्चात्य लोक एकाच पुरातन सस्कृतीच्या पुराव्याचा आपल्याला सोयिस्कर असा अर्थ लावतात. जाणीवपूर्वक गैरसमज करून देतात. प्राचीन प्रगल्भ सस्कृती म्हणजे ग्रीको-रोमन सस्कृती असाच प्रचार ते सदैव करतात. वास्तविक ग्रीक किंवा रोमन संस्कृतीपेक्षा इराणची सस्कृती अति-प्राचीन आहे हे सत्य फार थोड्या जणाना माहीत आहे. इराण-मधील प्रसिद्ध फिलॉसॉफर इब्न् सीना, ज्याला पाश्चिमात्य जग अव्हीसेना ह्या नावान ओळखतं, त्यान हजार वर्षांपूर्वी वैद्यकशास्त्रा-वरील पहिला ग्रथ लिहिला. अनेक भाषात ह्या ग्रंथाची भाषातरं झाली. लवकर न बऱ्या होणाऱ्या जखमेवर एक विशिष्ट प्रकारची बुरशी आलेला ब्रेडचा तुकडा बाधावा अस इब्न् सीनानं लिहिलं होतं विसाव्या शतकात अलेक्झाडर फ्लेमिंगनं बुरशीपासून पेनि-सिलीनचा शोध लावला हे सर्वश्रुत आहे ह्या अलेक्झाडरनं इब्न् सीनाच्या वैद्यकशास्त्रातून काही प्रेरणा घेतली का ह्याबद्दल मात्र कसलाच उल्लेख सापडत नाही—अलेक्झाडर फ्लेमिंगनं तशी प्रेरणा घेतली असेल तर ती गोष्ट मुद्दाम अंधारातच ठेवण्यात येईल.'

## धन्वंतरी चरक

'ग्रीको-रोमन संस्कृतीचा वारसा सागणारे हे लोक महाचोर आहेत असं माझं वैयक्तिक मत आहे' मी काहीसं चिडीनं म्हणालो—'अर्थात आमची स्वत बद्दलची उदासीनता ह्यामुळंच आम्ही अनेक महत्त्वाच्या गोष्टी हरवून बसलो आहोत हे मान्य करायलाच पाहिजे आमच्या हिंदमध्ये चरक नावाचा सुप्रसिद्ध धन्वतरी होऊन गेला. सर्पगधा वनस्पतीपासून रक्तदाबाच्या रोगावर उपाय त्यानं सुचवला होता. मूळ शोध आमचा; पण सर्पगंधेपासून औषध कुणी बनवल? ग्रीको-रोमन संस्कृतिवाल्यानी! आम्हाला बनवता आलं नसतं? नक्कीच आलं असतं; पण आमचे तथाकथित शास्त्रज्ञ हे पाश्चिमात्त्यानी 'लावलेल्या शोधाची' कॉपी करणारे! आमच्या येथील ग्रंथाचा आधार घेऊन काही संशोधन करण्याची कल्पना देखील ह्या मॉडर्न सायंटिस्ट मंडळीना एकदम प्रतिगामी वगैरे वाटते—दुर्दैव आहे! रिडर्स डायजेस्टसारखं भिक्कार मासिक वाचून 'ज्ञानसाधना' करणाऱ्याचा काळ आला आहे—'

माझ्या मनातील चीड उफाळून येत होती. सर्फराझचे वडील मला चुचकारत म्हणाले—'इराज तुझ्याप्रमाणेच म्हणतो; पण त्याचे विचार अगदी टोकाचे आहेत—फारच टोकाचे. मला कधीकधी भीती वाटते ...पुरातत्त्वाचा अभ्यास जसजसा वाढत चालला आहे तशा अनेक नवीन गोष्टी उघडकीस येत आहेत...दुर्दैवानं हे सर्व शोध इंग्लिश, फ्रेंच, जर्मन ह्या पाश्चिमात्य भाषामधून प्रसिद्ध होत आहेत. तुमच्या हिंदी भाषेत कितपत अद्ययावत् माहिती उपलब्ध आहे ह्याची मला कल्पना नाही, पण आमच्या फार्सीमध्ये अजून म्हणावी तशी आधुनिक विज्ञानाची, पुरातन सस्कृतीची माहिती देणाऱ्या ग्रंथाची निर्मिती होत नाही. त्यामुळ उपलब्ध असलेलं, होत असलेलं ज्ञान ही मूठभर आग्लभाषा जाणणाऱ्याची मक्तेदारी होऊन बसली आहे. सर्वसामान्य माणूस ज्ञानापासून, सत्यापासून त्यामुळं दूर दूर जातोय—पाश्चिमात्य

भाषेचं ज्ञान असणाऱ्या मूठभर पढ्यालिस्यांनी स्वार्थी हेतूनच सामान्य माणसाला जाणूनबुजून अंधारात ठेवण्याचा प्रयत्न चालवलाय असं मला कधीकधी वाटतं. जगामध्ये काय चाललंय ह्यावद्दलची अद्ययावत माहिती प्रत्येकाला आपल्या मातृभाषेत वाचायला, ऐकायला मिळाली तर ! पण हे कधी काळी होईल असं सध्या तरी दिसत नाही! अरे, साधी गोष्ट लक्षात घे. रोमन साम्राज्य अस्तित्वात येण्याच्या अनेक शतके अगोदर प्राचीन इराणमध्ये मध्यवर्ती आणि प्रांतीय अशी द्विस्तरीय राज्ययंत्रणा, आणि रिपब्लिक म्हणता येईल अशा धर्तीची राज्यपद्धती होती हे सत्य किती आशियायी लोकांना माहीत असेल ? राज्यकारभारात क्षमता येण्यासाठी आवश्यक असलेली रस्ते, महामार्ग, टपाल वगैरे अत्यंत महत्त्वाची दळवळणाची साधनं इराणनं प्रथम निर्माण केली. जगातील पहिली वेधशाळा इराणमध्ये होती. सांकेतिक खुणांनी संदेश देण्यासाठी उंच मनोऱ्यावर रेल्वेच्या सिग्नलप्रमाणे यंत्रे ( Semaphore ) बसविण्याची प्रथा प्राचीन इराणमध्ये जन्माला आली. सोन्याची आणि चांदीची नाणी सर्वप्रथम इराणमध्ये वापरात आली. अडीच-तीन हजार वर्षांपूर्वी संपूर्ण इराणी साम्राज्यात सर्वत्र समान प्रमाणाची वजने आणि मापे व्यवहारात वापरली जायची. एव्हढंच काय 'हुंडी' किंवा 'चेक' स्वीकारण्याची किंवा वटविण्याची पद्धत प्राचीन इराणमध्ये सर्रास प्रचारात होती !'

मला ही सर्व माहिती अतिशय नवीन होती. शाळेमध्ये इतिहास शिकलो तेव्हा अलेक्झांडर द ग्रेट, रोमन सिनेटर्स, त्यांचे ट्रिब्यून—सीझर वगैरेच वाचावं लागलं होतं. इराणच्या प्राचीन संस्कृतीत आधुनिक मानवाच्या पाऊलखुणा उमटल्या आहेत हे तेव्हा कुणीच समजावून सांगितलं नव्हतं. त्यानंतर फारसं काही वाचनात देखील आलं नव्हतं. इराणमध्ये पाय ठेवल्यापासून माझ्या विचारसरणीला अनेक वेळा अनपेक्षित धक्के बसत होते. ह्या देशावद्दलचं कुतूहल पदोपदी वाढत चाललं होतं. जे पहात होतो, ऐकत होतो, अनुभवत होतो ते सर्वच अपरिचित, नवीन आणि जिज्ञासा जागृत करणारं. शियापंथी मुसलमान लोकांच्या ह्या देशाशी काही तरी अगदी जवळचे रक्ताच्या नात्यागोत्याचे संबंध असावेत असं मला अनेक वेळा वाटायचं.

सर्फराझचे वडील सांगत होते— ज्या काळाला युरोपियन लोक इतिहासपूर्व मानतात त्याच काळात इराणच्या कास्पियन समुद्राच्या काठी सुसंस्कृत मानवांच्या वस्त्या होत्या, ह्याचा पुरावा हल्लीच उत्खननात सापडला आहे. अझरबैजान प्रांतातील हसनलू ह्या गावी उत्खननामध्ये एक अप्रतिम धाटणीचं नक्षीदार सुवर्णपात्र सापडलं. त्याच जागी एक भव्य राजवाडा असल्याचं पुराणवस्तु संशोधकांच्या निदर्शनास आलं. तो राजवाडा आणि सुवर्णपात्र इ. स. पूर्व दीड-दोन हजार किंवा त्याहूनही प्राचीन असल्याचं चाचणीत सिद्ध झालं आहे. जे कुणी लोक इथं वस्ती करून होते ते अतिशय प्रगत होते हे तिथं सापडलेल्या इतर अनेक वस्तूवरून संशोधकांच्या ध्यानात आलं आहे. —आर्यांच्या टोळ्या इराणमध्ये घुसल्या. त्यानंतर मात्र ह्या 'मूळ इराणी' लोकांचं काय झालं ह्याचा मात्र थांगपत्ता लागत नाही... लवकरच ही माहितीदेखील उजेडात येईल अशी संशोधकांना आशा आहे आणि त्यानंतर बरीच कोडी सुटतील—'

माझ्या मनात पुन्हा नाना प्रकारच्या विचारांनी आटयापाटयांचा खेळ मांडला. अझरबैजान हा प्रांत टर्कीच्या— मेडिटरेनियनच्या जवळचा. भारतामधील द्रवीड हे मूळचे मेडिटरेनियन असं काही जण मानतात. हसनलूजवळ जे सुवर्णपात्र सापडलं ते द्रविडांच्या पूर्वजांचं तर नसावं ? आणि कास्पियन समुद्राच्या काठी वस्त्या करून असणारे हे लोक कोण ? आपले कश्यपमुनी वगैरे तर नव्हेत ?

कपातील थंड कॉफी मी एका घोटात संपवली. मनातील विचार सर्फराझच्या वडलांना सांगण्यासाठी मी शब्दांची जुळवाजुळव करत होतो इतक्यात सर्फराझ आत आला— रुंद हसत 'गुड मॉर्निंग' म्हणत शेजारच्या खुर्चीवर बसला. 'बर्बरी' नानचा एक तुकडा तोंडात कोंबत म्हणाला—

'शिराझमध्ये सगळं शांत आहे, नो प्रॉब्लेम मी सुबहने आटोपतो. तू पण थोडी कॉफी घे ! मग आपण कामाला बाहेर पडू या !'

'विद्यार्थ्यांनी दंगल कशामुळे केली, काय काय घडलं ते समजलं का ?'— मी विचारलं.

'सांगतो, सांगतो— सगळं सांगतो' म्हणत सर्फराझनं एक उकडलेलं अंडं तोंडात कोंबलं. मादरजाननं माझ्यासमोर कॉफीचा ताजा कप ठेवला.

(क्रमशः)


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# ‘ चरित्र-आत्मचरित्र हा माझा आवडता वाङ्मयप्रकार आहे. ’ —डॉ. य. दि. फडके

## मुलाखत : चंद्रशेखर राजे

[ कोणत्याही मान्यवर व्यक्तीची जडणघडण कशी झाली, त्याचे जीवनातील विरंगुळयाचे विषय कोणते आहेत, सबंध जीवनाकडे तो कशा तऱ्हेने पाहतो याबद्दल सामान्य माणसाला नेहमीच कुतूहल असते. या कुतूहलापोटीच प्रसिद्ध राजकीय विचारवत-लेखक डॉ. य. दि. फडके याची मी भेट घेतली. तसे एक निमित्तही होते. डॉ. फडके लवकरच मुबई सोडून पुणे विद्यापीठात दाखल होत आहेत. भेटीत निरनिराळ्या विषयावर गप्पा झाल्या त्या प्रश्नोत्तर स्वरूपात वाचकापुढे येथे माडल्या आहेत. ]

प्र : आपण लेखनास केव्हा सुरुवात केलीत? सुरुवातीचे लेखन कशा प्रकारचे होते? मोबदला मिळे काय? का केले? कोणाचे अनुकरण?

उ : मी वयाच्या १४ व्या १५ व्या वर्षापासून लेखन करतो आहे. माझे सुरुवातीचे लेखन ललितस्वरूपाचे म्हणजे कथालेखन होते. शाळकरी विद्यार्थीदशेपासून माझ्या कथा मौज, विविधवृत्त, झंकार, ज्ञानप्रकाश, यशवंत, स्त्री, मनोहरसारख्या नियतकालिकातून छापून येऊ लागल्या. माझ्या पहिल्या कथेपासूनच मला मोबदला मिळू लागला. म्हणूनच की काय मोबदल्याशिवाय लिहावयाचे नाही ही सवय मला लागली. आपले नाव छापून आले, नाव झळकले हा अभिमान, बरोबरचे विद्यार्थी आपल्याला लेखक समजतात आणि आलेल्या मानधनातून खूप सिनेमा पहायला (आणि प्रवास करायलाही) मिळतात अशा विविध कारणासाठी हे लेखन झाले. जाणीवपूर्वक कोणाचेही अनुकरण केले नाही; पण त्या काळी लोकप्रिय असणाऱ्या ना. सी. फडके आणि वि. स. खाडेकर यांची छाप पडली.

प्र : हे लेखन केव्हा थाबवलेत? का थाबवलेत?

उ : या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी त्यामागची गमतच सागतो. मला शाळकरी जीवनात हाणामारीचे चित्रपट व रहस्यकथा याचे फार आकर्षण होते शाळेत चित्रकलेचा तास असे. मला तर चित्रकलेचे वावडे होते. त्यासाठी चित्रकार मित्राची मदत घ्यावी लागे. त्या मोबदल्यात त्याना एखादी रहस्यकथा सागावी लागे किंवा हाणामारीच्या चित्रपटाची गोष्ट सागावी लागे. त्यामुळे असे वाटू लागले की, आपण इकडले तिकडले घेऊन एखादी रहस्यमय कादंबरी लिहावी. मोबदलाही घसघशीत मिळेल आणि नावही होईल. सेक्स्टन ब्लेकच्या गुप्त पोलिसचातुर्यकथा त्या काळात लोकप्रिय होत्या. त्यातील एकीला मराठी पोशाख चढविला. मुबई न पाहता मुबईतल्या रस्त्याचे वर्णन केले!

प्र : ती कादंबरी आहे का तुमच्याकडे?

उ. नाही हो. केव्हाच गहाळ झाली! अशा तऱ्हेने लेखनाचे पैसे मिळत असले, प्रसिद्धी मिळत असली तरी हे सारे खोटे आहे; आपण अजून जग पाहिले नाही; आपल्याला समग्र जीवन कळले नाही असे वाटू लागले म्हणून लेखन थाबविले.

प्र : मग पुन्हा लेखनाला केव्हा सुरुवात केलीत?

उ : अनेक वर्षांत लिहिले नाही म्हणून मित्रानी डिवचले ते म्हणू लागले, ‘तुला आता लिहिता येणार नाही!’ त्याच्या बोलण्यामुळे मी अस्वस्थ झालो. त्याना म्हणालो, ‘मनात आणलं तर आजही लिहू शकेन!’ त्याचे हे आव्हान मी मनोमन स्वीकारले. पुन्हा काही कथा लिहिल्या. त्यातील काहीना बक्षिसेही मिळाली. लेखनाचे कसब आपण गमावले नाही याची साक्ष पटली. या काळातील लेखनामागे मोबदल्यापेक्षा, प्रसिद्धीपेक्षा आपण लेखनाची शक्ती गमावली नाही हे अजमावून पाहण्याची प्रेरणा महत्त्वाची होती. त्यानतर मात्र ज्या विषयावर ज्या तऱ्हेने लेखन करावे असे वाटत होते तसले लेखन करताच आले नाही.

प्र : त्याची कारणे अगदी खाजगी स्वरूपाची नसल्यास सागू शकाल का?

उ : त्याला कारण म्हणजे मी स्वीकारलेली सरकारी चाकरी हे आहे. राजपत्रित सरकारी अधिकारी म्हणून (असल्यामुळे) राजकीय किंवा वादग्रस्त विषयावर लिहिता आले नाही. सरकारी अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करणाऱ्या ‘स्टाफ कॉलेज’ मध्ये मी ‘Public Administration’ शिकवीत असे.

प्र : या नोकरशहाची, खऱ्या राज्यकर्त्यांची तुमच्याकडे पाहण्याची दृष्टी कशी होती?

उ : माझे हे विद्यार्थी सरकारी अधिकारी वयाने व अनुभवाने माझ्यापेक्षा मोठे होते; पण त्यानी मला चागले वागविले. त्याची प्राध्यापकाकडे पाहण्याची दृष्टी परपरागत असल्यामुळे म्हणा वा त्याच्या सौजन्यामुळे म्हणा मला त्यानी कमीपणाची वागणूक कधीच दिली नाही. एक मात्र खरे की जो विषय मी शिकवीत होतो तो विषय शिकविणारा प्राध्यापकच त्या वेळी नव्हता आणि मी माझ्या विषयातला तज्ज्ञ होतो. त्याचा प्रत्यक्षानुभव तर माझा. पुस्तकी अनुभव असे जरी असले तरी ते दिवस आनदात गेले तरी एक रुखरूख मनात होतीच.

प्र : सर्व काही व्यवस्थित असताना अशी कोणती रुखरूख अस्वस्थ करीत होती?

उ : मनासारखे लिहिता येत नाही ही रुखरूख स्वस्थ बसू देत नव्हती आणि त्याच वेळेस मुबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र-विभागात जागा निर्माण झाली. मी अर्ज केला. माझी निवड झाली. मानसन्मानाची नोकरी मनासारखे लेखन करता यावे यासाठी सोडली. त्यानंतर प्राध्यापकी पेशाची गरज म्हणून आणि आवड म्हणून लिहू लागलो.

प्र : आपल्या मराठी आणि इंग्रजी लेखनामुळे आपणास मान्यता मिळाली की, केवळ इंग्रजी लेखनामुळेच आपला दबदबा पसरला?

उ : मराठी व इंग्रजी लेखनामुळे व्यापक

मान्यता मिळाली; पण भारतातील व बाहेरील माझ्या विषयाच्या अभ्यासकाचे माझ्याकडे लक्ष वेधले ते माझ्या इग्रजी लेखनामुळे व विशेषत माझ्या 'Social Retormers of Maharashtra' या इंग्रजी ग्रंथामुळे माझ्या मराठी लेखनामुळे व वक्तृत्वामुळे महाराष्ट्रात व महाराष्ट्रांवाहेरील मराठी समाजात मला मान्यता मिळाली.

प्र : लेखक आणि वक्ता म्हणून आपण प्रसिद्ध आहात. ही जडणघडण कशी झाली ?

उ : माझ्यावर शाळेपासून संस्कार होत गेले. कॉलेजमध्ये असताना कन्नड महाकवी प्रा. बेन्द्रे याचा सहवास व मार्गदर्शन मिळाले. माझ्या जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा आहे. इंग्रजीतील अस्तित्ववादावरची पुस्तके त्यांच्या सागण्यामुळे वाचली. त्या काळात भरपूर मराठी व इंग्रजी वाचन केले.

प्र : सरकारी मानसन्मानाची चाकरी आवडत्या विषयावर लिहिण्यासाठी सोडलीत असे म्हणालात. तसे लेखन करता आले काय ? हे लेखन कशा प्रकारचे होते आणि आहे ? त्यामागचा हेतू कोणता आहे ?

उ : मुवई विद्यापीठात आल्यानंतर राजकीय, सामाजिक वादग्रस्त प्रश्नावर लिहावयाम सुरुवात केली: विदेशी लेखक भारतीय, मराठी जीवनावर आस्थेवाईकपणे लिहितात. त्याच्या पागुळगाड्याशिवाय आपल्याला स्वतंत्रपणे लिहिता आले पाहिजे असे वाटू लागले. गतघटनाचे विश्लेपण करता आले पाहिजे. सामाजिक, आर्थिक, राजकीय इ. प्रश्नांवर मुळात जाऊन लिहिता आले पाहिजे. मूळ साधने धुडाळणे, त्याची कसोशीने छाननी करणे ही शास्त्रशुद्ध पद्धती मी स्वीकारली. मूळ मराठीतून लिहावे व नंतर इंग्रजीतून लिहावे असे वाटू लागले. संशोधन करणे हा माझ्या प्राध्यापकी कामाचाच एक भाग आहे. महाराष्ट्रातील समाजजीवन व राजकारण यावद्दल बऱ्याच वर्षांपासून मला कुतूहल आहे. त्यासंबंधी प्रसिद्ध होणारी पुस्तके मी वाचली. मराठी माणसाला इतिहासाचे वेड असले तरी ते शिवकालापासून ते पेशवाईअखेरपर्यंतच्या काळापुरतेच असते आणि आहे. आधुनिक महाराष्ट्राचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक इतिहास लिहिला गेला नाही ही उणीव मला जाणवू लागली. त्या दिशेने मी संशोधन करू लागलो

प्र : या संशोधनातून भरीव स्वरूपाचे असे कोणते लेखन झाले ?

उ : अखिल महाराष्ट्र ढवळून टाकणाऱ्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा सतत सात वर्षे अभ्यास केला. या चळवळीशी संबध आलेल्या अनेक थोरामोठयाच्या गाठीभेटी घेतल्या. त्याच्याकडची कागदपत्रे काळजीपूर्वक पाहिली. यातूनच माझा Ph. D. चा (इंग्रजी) प्रबंध तयार झाला. प्रा. न. र. फाटक याच्या गोखले (नामदार गोपाळ कृष्ण) चरित्रातील टिळकासबधीच्या मताचा समाचार त्या ग्रंथाचे परीक्षण करताना घेतला. प्रा. फाटकानी ओळख झाल्यानंतर हा प्रतिकूल अभिप्राय मनावर न घेता मला आगरकरावर (गोपाळ गणेश) लिहायला सागितले. आगरकर, टिळक व गोखले या 'वाळगोपाळाचा शोध' घेऊ लागलो या व्यक्तीच्या संदर्भातले लोकप्रिय समज वस्तुस्थितीला धरून नाहीत. मूळ कागदपत्र न पाहता भल्याभल्यानी लिहिले म्हणून त्याची दिशाभूल झाली (व त्यानी इतराची दिशाभूल केली.)

प्र : एखादा प्रसग सागाल काय ?

उ : होय. आगरकरांची जिवंतपणी प्रेतयात्रा निघाली हे मान्यानी लिहिले. तो समज आजही कायम आहे; पण अशी घटना घडल्याची नोद कोठेच नाही. असे काहीही घडले नाही !

प्र : या थोर व्यक्तीकडे पाहण्याची आपली दृष्टी कोणती आहे ?

उ : महापुरुषदेखील माणसेच असतात याचे भान मी ठेवतो. तसे भान न ठेवता भक्तिभावाने, भावडेपणाने लिहिले जाते. त्यामुळे अशा महापुरुषावर लिहिलेल्या पुस्तकांना स्तुतिस्तोत्राची कळा येते. त्याऐवजी अस्सल पुरावे शोधून (अशी अनेक कागदपत्रे मी उजेडात आणली.) आपल्यापरीने मूल्यमापन करायचा प्रयत्न मी करतो.

प्र : नवीन कोणते सशोधन (लेखन) हातात घेतले आहे ?

उ : सत्यशोधक ब्राह्मणेतराच्या चळवळीचा इतिहास लिहितो आहे.

प्र : हे काम करत।ना तुम्ही ब्राह्मण आहात म्हणून काही अडचणी आल्या का ? येतात का ?

उ : जाहीरपणे कोणीही माझ्या जातीचा उल्लेख करून आक्षेप घेतला नाही; पण पत्ररूपाने आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली.

प्र . कोणी केली ?

उ : कोल्हापूरच्या (गारगोटी येथील) मौनी विद्यापीठातील एका अभ्यासकाने लिहिलेले हे पत्र पहा. (ते पत्र मला वाचावयास देतात ) त्याची भाषा कशी आक्रमक आहे ते पहा मी त्याना माझी भूमिका पत्राने कळविल्यानतर त्याचा बदललेला सूर पहा (त्याचेच दुसरे पत्र दाखवितात.) माणसे जातीच्याा दृष्टिकोनातून विचार करतात त्याला माझा नाइलाज आहे. माझी भूमिका सत्यशोधकाचीच आहे. भले इतर काहीही म्हणोत.

प्र : डॉ. आवेडकराचे यथायोग्य मूल्यमापन ना दलित समाज करतो आहे, ना दलितेतर करतात. हे योग्य आहे काय ?

उ . डॉ. आवेडकर आणि दलित समाज हे नाते फार नाजूक आहे. अहो, लोकमान्य टिळकाचा मृत्यू होऊन साठ वर्षे झाली. पुढारलेला समाज आता आता त्यांच्याकडे जरा अलिप्तपणे पाहू लागला आहे. तशी अपेक्षा इतक्यातच दलित समाजाकडून करू नका. त्यात त्याचे काहीही चुकले नाही आणि चुकतही नाही.

प्र : आपण एकदा (क्रिकेटमॅचच्या उदाहरणावरून) असे म्हणालात की हिंदूही मसलमानाएवढेच जातीय आहेत. हे खरे आहे काय ?

उ : होय, ते खरेच आहे. पंचरगी क्रिकेट सामान्यापासून जो अनुभव मी घेत आहे त्यावरून काढलेला हा निष्कर्ष आहे.

प्र : आपल्याला क्रिकेटचा नाद फार पूर्वीपासून आहे असे वाटते. क्रिकेटचा खेळ पाहणे, समालोचन ऐकणे हा अपव्यय नाही का ?

उ मला जसा चित्रपट पाहण्याचा शौक आहे तसाच क्रिकेटचाही आहे मला क्रिकेटने आनद दिला आहे. आजही मी आवर्जून दूरदर्शनवरचे सामने वघतो. हा अपव्यय आहे की नाही याचा विचारच मी केला नाही. माझ्या अत्यत आवडीचा असा तो विषय आहे.

प्र : इतर आवडीचे विषय कोणते आहेत ?

उ : मला केवळ क्रिकेटमध्येच रस आहे असे नाही तर इतरही खेळात मला रस आहे. मैदानात उतरलो नसलो तरी अनेक

खेळाची आवड मनापासून आहे. त्याशिवाय सगीताच्या मैफलीना जाऊन संगीताचा मनसोक्त आस्वाद घेणे, वेगवेगळ्या नामवंत वक्त्याची व्याख्याने ऐकणे हेही माझ्या खास आवडीचे विषय आहेत; पण ही आवड पूर्ण करण्यासाठी वेळच मिळत नाही ही खत आहे.

**प्र** : वाचक म्हणून कोणत्या प्रकारचे लेखन तुम्हाला जास्त आवडते ?

**उ** : चरित्र–आत्मचरित्र हा माझा आवडता वाङ्मयप्रकार आहे

**प्र** : साहित्यसमेलन हे ललित-लेखकांसाठीच असावे असा एक मतप्रवाह आहे. तो तुम्हास मान्य आहे काय ? तुम्ही साहित्यसमेलनाला कोणत्या नात्याने हजर राहता ?

**उ** : अजिबात मान्य नाही. मी आज जरी ललितलेखन करीत नसलो तरी ललितलेखनावर समीक्षा करतो, केली आहे. चरित्र-आत्मचरित्र ह्या माझ्या आवडीच्या ललित-वाङ्मयप्रकारावर समीक्षारूपाने लिहितो. त्या अर्थी मी समीक्षक आहे. समीक्षकाला साहित्यसंमेलनाचे दरवाजे बंद असण्याचे कारणच नाही

**प्र** : दलितसाहित्याबद्दल काय वाटते ?

**उ** : माझ्या बालपणी मी दारिद्रयाचा खूप अनुभव घेतला आहे. त्यामुळे गरिबीची मला जाणीव आहे आणि गरिबांबद्दल कळवळा आहे दलितसाहित्याबद्दल निश्चितच आस्था आणि कौतुक आहे

**प्र** : दूरदर्शनवरचे निवडणूकनिकाल, अन्वय आणि अर्थसारखे कार्यक्रम आपण का स्वीकारता ? सुईच्या कामासाठी कुऱ्हाड कशाला ?

**उ** : दूरदर्शन हे एक नवे आणि अत्यत प्रभावी असे माध्यम आहे. आपले विचार, आपल्या प्रतिक्रिया जास्तीत जास्त लोकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत असे मला आटते. केवळ वर्गातच राज्यशास्त्राचे शिक्षण देणे एवढाच मर्यादित हेतू ठेवून चालणार नाही. जेथे जेथे सधी मिळेल तेथे तेथे हे काम मी करतो. मी त्याला Extended classroom सारखे मानतो.

पुस्तके

# ग्रामीण कार्यकर्त्यांसाठी....

गेल्या काही वर्षात 'ग्रामीण विकास' हा शब्द सर्वतो मुखो झालेला आहे. अप्रगत देशांचा, विभागाचा, दुर्बल सामाजिक घटकाचा विकास हे आता परवलीचे शब्द बनले आहेत; पण विकासाचे जे आदर्श डोळ्यासमोर ठेवले जातात ते एक तर फार अस्पष्ट असतात किंवा चुकीचे, आधळी उसनवारी करणारे तरी असतात. मुख्य म्हणजे उत्पादनवाढ म्हणजे विकास, एवढ्यापुरतेच समीकरण बहुताशी मांडले जाते. कारण पाश्चिमात्य देशात झालेले समाजाचे आधुनिकीकरण हा आदर्श म्हणून पुढे ठेवला जातो. विकासाचे पर्यायी मार्ग शोधण्याचे प्रयत्न काही गट; संस्था करीत आहेत; पण ते बहुताशी एतद्देशीय वा परदेशी बड्या हितसबधीकडून आलेल्या पैशावर अवलंबून असतात. दुसरे म्हणजे विकासाच्या पर्यायी मार्गाविषयीचे तत्त्वज्ञान मांडून त्याचा पद्धतशीरपणे प्रचार करण्याचे काम त्यांच्याकडून निदान महाराष्ट्रात तरी झालेले नाही. हेमलता राइरकर व गी प्वॉंत्व्हॅं याचे 'जनजागरण स्वायत्त ग्रामीण विकास' हे पुस्तक म्हणजे तसा एक अभ्यासपूर्ण प्रयत्न झाहे.

डावी विचारसरणी, पॉंपोक्रेरे व पाश्चिमात्य राष्ट्रातील प्रदूषण–विरोधी गट याचा प्रभाव लेखकावर आहे व ह्या तिन्ही प्रवाहाचा समन्वय साधून विकासाविषयी एक दृष्टिकोन व आराखडा तयार करायचा प्रयत्न ह्या पुस्तकात केला आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीला विकासाच्या यात्रिक कल्पनेतील गृहीतकृत्ये लेखक पुढे आणतात व ह्या यात्रिक कल्पनेप्रमाणे झालेले प्रयत्न हे मूलत च चुकीच्या मार्गाने जाणारे कसे आहेत हे दाखवतात. अधिकाधिक वस्तूचे उत्पादन आणि उपलब्धता एवढ्यापुरतीच विकासाची कल्पना मर्यादित ठेवल्यावर काय दुष्परिणाम होतात ते आता पाश्चिमात्य राष्ट्राच्या अनुभवावरून माहीत झाले आहे त्याला पर्याय म्हणून माणसाच्या ज्या खऱ्या गरजा आहेत त्यावर आधारित अशा संतुलित प्रगतीचे ध्येय ठेवले पाहिजे असे लेखकाचे प्रतिपादन आहे.

प्रगतीच्या संदर्भात जास्त वस्तूची उपलब्धता हा एक निकष असायला पाहिजे हे लेखकाना अमान्य नाही; पण तोच एक निकष मानून पाश्चात्य भाडवली राष्ट्रांनी आदर्श विकासाचे चित्र उभे केले, ते बरोबर नाही. माणसामध्ये विभाजनातील विषमता दूर करणारी, जीवघेणी स्पर्धा नव्हे तर परस्पर सहकार्य निर्माण करणारी, अशी प्रगती असावी. लेखक म्हणतात, 'व्यवस्थापन असो वा प्रगतीच्या लाभाचे वाटप असो, प्रगती ही लोकाच्या (जे लोक सामूहिकरीत्या संघटित आहेत व ज्याचे व्यक्तिमत्त्व सामुदायिक आहे त्याच्या) निर्णयातून व्हायला पाहिजे.' विकासाचे अंतिम निर्देशक हे आकड्यानी मोजता येत नाहीत तर ते सामाजिक, राजकीय असतात अशी स्पष्ट भूमिका या पुस्तकात मांडली आहे. ज्या समाजाचा विकास झाला असे आपण म्हणतो त्याला खालील सास्कृतिक निकष लेखक लावतील—स्वतंत्र वृत्ती, लोकमताने मानलेल्या मूल्यावर दृढ विश्वास, बुद्धिवादाची चिकित्सक पात्रता, सहन केला जातो तो आणि सार्वजनिकरीत्या उत्तेजन दिले जाते तो स्पष्टवक्तेपणा. लेखकाना अभिप्रेत असलेल्या विकासात कोणत्या प्रकारचे तंत्रज्ञान वापरले जाईल ? तज्ज्ञ आणि तळचे लोक यांच्यात विचारमंथन झाले तर जे तंत्रज्ञान तयार होईल तेच योग्य तंत्रज्ञान ठरेल. वातावरणात वा भोवतालच्या परिस्थितीत कमीत कमी बिघाड होईल, वस्तू व शक्ती याची जास्तीत जास्त बचत होईल याची काळजी घेतली पाहिजे. भूगर्भातील व जमिनीवरील साधनांच्या तात्त्विक शक्तीचा उपयोग करून, अमर्याद वापर करून वातावरणातील समतोल बिघडवून टाकणारी, प्रदूषणाचा राक्षस निर्माण करणारी सध्याची आधळी तात्त्विक वाटचाल सोडून दिली पाहिजे असे लेखकाना वाटते. तंत्रज्ञान वा आर्थिक विकास हा तटस्थ नसतो. आज जे दडपलेले, पिळलेले आहेत त्याची मुक्ती झाली पाहिजे ! ह्या ध्येयासाठी विकास–तंत्र राबवले पाहिजे

विकाससंबधी लेखकानी माडलेली भूमिका

ही सध्या प्रचलित असलेल्या भूमिकेशी सरळ सरळ छेद देणारी आहे व तिचे स्वागत केले पाहिजे; पण ह्या लेखकाना अभिप्रेत असलेला विकास अंमलात आणण्यासाठी त्यानी सागितलेला प्रत्यक्ष कार्यक्रम विचित्र आहे. गावातील तरुणाचे गट स्थापून त्यांच्यामार्फत प्रथम 'सास्कृतिक कृती' घडवून आणायला काही बाहेरून गेलेल्या चेतकांनी मदत करायची व मग हळूहळू ग्रामीण जनतेच्या चेतना जागृत करायच्या अशी मूलतः योजना मांडली आहे चेतना जागृत करणाऱ्या चेतकाचे गावकऱ्यांशी संबंध कसे असावेत, हे पॉलो फ्लेरे यांच्या शिक्षणपद्धतीचा आदर्श समोर ठेवून चित्रित केले आहे; पण एक तर ग्रामीण कष्टकऱ्यांच्या रोजच्या जीवनातील आर्थिक, राजकीय प्रश्न घेतले जाऊन त्याबावत शिक्षण आंदोलन झाल्याशिवाय 'सांस्कृतिक कृती' मध्ये ते सातत्याने भाग घेतील असे वाटत नाही. लेखकांनी मांडलेल्या योजनेत तावडतोवीने भेडसावणाऱ्या आर्थिक, राजकीय प्रश्नावावत सघटित लढा उभारण्यावद्दल काहीच लिहिलेले नाही. अशा लढ्यांची पार्श्वभूमी नसताना विन-भितीच्या शाळा चालवून किंवा तत्सम सास्कृतिक कृती करून कसे जनजागरण होईल? . .

चेतकानी प्रत्यक्ष कोणता कार्यक्रम हातात घ्यायचा हे सांगताना काही आर्थिक कार्यक्रम सांगितले आहेत; पण त्यातील अनेक विकासयोजना आहेत. संघटनेमार्फत सामुदायिकरीत्या विशाल उद्दिष्टे ठरवणे आणि अंमलात आणणे हे नव्या सघटनेचे मुख्य काम आहे, असे म्हणून दिलेल्या कामाच्या यादीत वेकार, अर्धवेकार, अकुशल मजूरही शक्तीसाठी रोजगारीची संधी निर्माण करणे, वारा, सूर्य यांच्या शक्तीचा उपयोग करणे असे कार्यक्रम सुचविले आहेत. (पा. क्र. ४२) हातात साधनसंपत्ती असल्याशिवाय असे कार्यक्रम कसे घेता येतील? मूलभूत बदलासाठी आवश्यक अशा जनजागरणाचा कार्यक्रम म्हणून वरील कार्यक्रमाकडे कसे पहाता येईल?

मूळ पुस्तक साठ पानाचे आहे व परिशिष्ट या विभागाने १३० पाने व्यापली आहेत. पुस्तकाचा पहिला भाग व परिशिष्ट यातील फरक स्पष्ट होत नाही या परिशिष्टात प्रथम कार्यकर्त्याचा स्वत.चा दृष्टिकोन कसा असावा, तयारी काय असावी त्याची रूपरेषा दिली आहे. कामाचे एकूण उद्दिष्ट जसे असेल त्याप्रमाणे कार्यकर्त्याच्या जाणिवा, कामाचे स्वरूप ठरते हे वरून आलेले कल्याणकारी कार्यक्रम, समतावादी सुधारणा, क्रातिकारक वदल व विचारजागरण ह्या चार वेगवेगळ्या प्रकारच्या ध्येयासाठी काम करणाऱ्या चळवळीच्या उदाहरणाच्या आधारे एका तक्त्यात समर्पकपणे हे दाखवले आहे. ज्या विभागात काम करायचे त्या विभागाची 'सामाजिक-सांस्कृतिक पहाणी' कशी करायची, विन-भितीची शाळा कशी चालवायची, यावावत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणारी काही परिशिष्टे आहेत. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील खामगावमध्ये केलेल्या सास्कृतिक कृतीचे– (पाणवठा एक करणे) विवेचन व विश्लेषण एका टिपणात दिले आहे. बाकीची परिशिष्टातील टिपणे सैद्धातिक पातळीवरची आहेत. उदा. – प्रगत भाडवली देशांचा तिसऱ्या जगातील देशावर होणारा वाईट परिणाम, मुक्तीचे शिक्षण, चीनमधील समाजवादी सहकारी शेतीतील टप्पे इत्यादी टिपणे पुस्तकाच्या मुख्य विभागात समाविष्ट करणे जास्त योग्य झाले असते. प्रस्थापित शिक्षणपद्धतीला लेखकानी मांडलेला पर्यायही अपुरा वाटतो. ह्या प्रश्नावद्दल तपशिलात व खोलात विचार झाला पाहिजे. औपचारिक शिक्षणाला पूर्णपणे फाटा देऊन चालेल का? आजच्या औपचारिक शिक्षणातून एका बाजूला प्रस्थापित समाजाला आवश्यक अशी मूल्ये वाळगणारे, वरून लादलेल्या शिस्तीच्या चौकटीतच काम करणारे नागरिक तयार होतात; पण फक्त तेवढेच होते का? शिक्षणाविषयी लेखकाची मते अतिरेकी आहेत असे काही ठिकाणी जाणवते. समजावून सागणे, भाषणे, घोषणा, शिकविणे या गोष्टी शिक्षणाच्या आड येतात' असे त्यानी एके ठिकाणी (पा. क्र. १२५) म्हटले आहे.

पण तरीही ग्रामीण विकासावद्दल ठाम भूमिका माडण्याचे काम या पुस्तकाने केले आहे. ग्रामीण विकासावद्दल आस्था असणाऱ्या अनेक संस्था, गट उभे रहात आहेत. अशानी या पुस्तकात माडलेल्या विश्लेषणाचा गभीर विचार करून स्वत.च्या कामाचे मूल्यमापन केले पाहिजे. ग्रामीण भागातून आलेल्या कार्यकर्त्याला मात्र कोणाच्या तरी मदतीने हे पुस्तक वाचावे लागेल. पुस्तकाची किंमत मात्र कार्यकर्त्याच्या ऐपतीच्या मानाने जास्त वाटते

**–अनंत फडके**

**जनजागरण–स्वायत्त ग्रामीण विकास**
हेमलता राईरकर
जनबोध प्रकाशन
गी पांतव्हें

---

## फिनिक्स निवड

# Books In Offing

---

एखाद्या लेखकाचे पुस्तक लोकप्रिय झाले की त्याच्या लेखणीतून पुढचे पुस्तक केव्हा प्रसूत होईल याकडे त्याच्या वाचकाचे लक्ष खिळलेले असते. 'काय, आता काय लिखाण चालले आहे?' हा प्रश्न अनेक लोक त्याना विचारत असतील. मी सुद्धा इग्रजी नियतकालिकात सध्याचे लेखक काय लिहितात ही माहिती गोळा करीत असतो. कधीकधी एखाद्या लेखकाला त्याच्या आवडीची थीम मिळते व तो लवकरच आपले पुस्तक बाजारात येणार या कल्पनेने सुखावतो. प्रसूत झालेली बाई जसे अर्भकावर वात्सल्य करते तसेच काही लेखकाना आपले पुस्तक प्रकाशित झाले की वाटत असते; परंतु लव्ह मॅरेजमध्ये जशी Eureka Woman चीच शोकातिका होते तशी बऱ्याच वेळेला Eureka थीमच वर्षानुवर्षे लेखकाच्या हातावर तुरी देत असते! माझ्या ग्रंथालयात मात्र एखादे पुस्तक वाइड होऊन तयार झाले की मला हा आनंद मिळतो. कारण आमचे बाइंडिंग इतके कष्टप्रद आहे की वाइंडर मुलीच्या हातातून एखादे पुस्तक प्रसवले की मी एक भला मोठा सुटकेचा निःश्वास सोडतो! तर मग माझेच जर एखादे पुस्तक निघाले व ते पुस्तक आमच्या ग्रंथालयातील बाइंडर मुलीच्या हातातून वाइंड होऊन आले तर मला मनस्वी आनंद होईल व माझ्या

डोळयातील ओतप्रोत वात्सल्यगगनात मावेनासे होईल !

कधीकधी नॉन फिक्शन इतके प्रभावी असते व त्याला इतकी गती येते की ते फिक्शनसारखे वाचले जाते. उदाहरणार्थ 'फ्रीडम अॅट मिडनाइट' तरुण मडळीना इतिहास शिकवण्यासाठी शैली लागते ती अशी. नाही तर 'इसवी सन या साली बुधवारी हे असे घडले. त्यानंतर १५ वर्षांनी म्हणजे इसवी सन...साली ही दुसरी घटना घडली'. अशा शुष्क शैलीने इतिहास कंटाळवाणा होत असतो; परंतु लॅरी कॉलिन्स व डॉमिनिक लापिए याची इतिहास लिहिण्याची ढब म्हणजे मसाला डोसाच ! चविष्ट व माहितीपूर्ण. कै. ना. सी. फडके यानी त्यांच्या 'साहित्यगंगेच्या काठी' या दोन लेखकांना धारेवर धरले आहे; परतु मी असा प्रश्न विचारतो की, हे पुस्तक वाचून किती हजार माणसे स्वातत्र्यपूर्व काळाचा इतिहास शिकली? नेहरू, सावरकराचा अवमान वगैरे या पुस्तकात झाला ते मान्य; पण इतिहास हा अनेक व्यक्तीचा मिळून झालेला असतो. त्यात एक-दोन व्यक्तीना अति महत्त्व देणे योग्य ठरणार नाही. कॉलिन्स, लापिए हे लेखकद्वय आता फिक्शनकडे वळलेय. त्याच्या नवीन पुस्तकाचे नाव असेल 'The Fifth Horseman. या पुस्तकात सबंध न्यू यॉर्क शहर एका अरब देशाने ओलीस धरले आहे नेहमीप्रमाणे या पुस्तकात बऱ्याच फॅक्टस् आहेत असे हे लेखक पार्टनर्स म्हणतात. एकदा काही अतिरेक्यानी बोस्टन शहर असेच उडवण्याची धमकी दिली होती.

अॅपॉकॅलिप्स हे हिब्रूमधील पौराणिक साहित्य. भविष्य वगैरे सागणारे. (त्याचा अर्थ रिव्हिलेशन असा होतो.) या प्रकारचे साहित्य प्रतीकात्मक लिहिले गेले होते. Four Horsemen of the Apocalypse वगैरे. यावरूनच भागीदार लेखकानी द फिफ्थ हॉर्समेन हे नाव दिले आहे. 'The title reflects the growing belief that nuclear weapons are indeed the fifth horseman of the Apocalypse.

धंद्यामध्ये जशी भागीदारी फार काळ टिकू शकत नाही तशी ती लेखनामध्ये सुद्धा टिकत नाही असे वाटते. मराठीत पूर्वी भारती काकतकर–रोहिणी पटवर्धन, शैलजा राजे–मा द्वा. कारखानीस, जयंत रानडे–राजीव नायर, जगन फडणीस–अशोक जैन, कुसुम अभ्यंकर–डॉ. अत्रे, माणूसमध्ये हर्डीकर–कामत, पोडा–डॉ. पटवर्धन, पोडा–विवलकर, पोडा–मराठे अशी भागीदारी दिसायची. या सर्व पार्टनरशिप्स डिझॉल्व्ह झाल्यासारख्याच वाटतात. इंग्रजीमध्ये मात्र रॉबिन मूर–अल डॅम्पसी, बर्नस्टाइन–वुडवर्ड, पीटर टॉमकिन्स–ख्रिस्तोफर बर्ड, शैला ऑस्ट्रेंडर–लीन इरोडर वगैरे एकदा किंवा अनेकदा भागीदारी केलेले लेखक आढळतात; पण लॅरी कॉलिन्स व डॉमिनिक लापिए यांची भागीदारी मात्र चिरकाल टिकून आहे !

आर्यविंग वॉलेसची बायको सिल्विया वॉलेस लिहिते : मुलगा (डेव्हिड वॉलेचिन्स्की) व मुलगी अॅमी हे सुद्धा लेखक आहेत. म्हणून त्याना 'The Writing Wallaces' म्हणतात. त्यामुळे एकदा आर्यविंग वॉलेस म्हणाले होते, 'आता माझी 'हाउसमेड' सुद्धा पुस्तके लिहायला लागेल !' या वॉलेसचे पुढचे पुस्तक असेल The intimate sex lives of famous people यात ४०० ख्यातनाम लोकाची अशी माहिती दिली आहे. त्यात क्वीन व्हिक्टोरिया, मॉमपासा, कॅसानोव्हा व महात्मा गांधी आहेत. आर्यविंग वॉलेस म्हणतात की तरुणपणी गाधीची sex तृष्णा अघोर होती; पण पुढे त्याना कळून चुकले की त्यामुले आपला सत्यानाश होईल म्हणून ते थांबले ! आर्यविंग वॉलेस आणखीन एक कादबरी लिहिताहेत तिचे नाव आहे The Second Lady. ही कादबरी दोन स्त्रियावर आहे 'याव्यतिरिक्त मी आता काही सागू इच्छित नाही' असे ते म्हणतात.

रूल्स् वालेक्स हॅली काय लिहीत आहेत ? तर सर्च. ही सर्च कसली आहे ? तर रूटसूची म्हणजे त्यानी रूटस् कसे लिहिले वगैरेची. इंग्रजीत हा प्रकार अप्रतिमच आहे. आर्यविंग वॉलेसनीसुद्धा 'द प्राईझ' ही कादबरी कशी लिहिली त्यावरच एक पुस्तक लिहिले आहे. 'The writing of one novel.'

अन्वर सादतच्या आत्मचरित्राचा एक भाग प्रसिद्ध झालेला आहे. त्याचे नाव आहे 'In Search of Peace.' ते आता दुसरा भाग In Search of Identity लिहीत आहेत. या दुसऱ्या भागात १९७८ मध्ये कॅंप डेव्हिड येथे खरोखर काय घडले याचा अहवाल असेल. शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिकन, इस्रायली व अरब याच्याशी त्यांनी कशा वाटाघाटी केल्या याचेसुद्धा वाचनीय वर्णन यात आहे. या पुस्तकात त्यानी लिहिलेले प्रेसिडेंट कार्टर याचे छानसे चित्र असेल.

इतिहासकार जॉन आयझेनोव्हर हे अमेरिकेचे माजी अध्यक्ष ड्वाइट डी आयझेनोव्हर याचे चिरंजीव. ते युद्धावर एक माहितीपूर्ण पुस्तक लिहीत आहेत. युद्धातील तह हे फार वेळ टिकत नाहीत, पण रूझवेल्ट, चर्चिल व स्टॅलिन याच्यातील तह दुसऱ्या विश्वयुद्धात शेवटपर्यंत टिकून होता. हा तह चमत्कारिक व विक्षिप्त असून इतका वेळ का टिकला याचे विवेचन आयझेनोव्हरनी या पुस्तकात केले आहे केवळ आपल्या वडिलाचे गुण गाण्याचे काम त्यांनी या पुस्तकात केले नाही; पण दुसऱ्या विश्वयुद्धाच्या वाङ्मयात एक तोलामोलाची भर घातली आहे खरं तर लेखकाचे वडील या तहाचे केन्द्रबिंदू होते. तरी पण आयझेनोव्हरनी व्यक्तिपूजा केलेली नाही. अमेरिकेचे प्रख्यात प्रकाशक डबलडे हे पुस्तक या वर्षी प्रसिद्ध करतील. किंवहुना आतापर्यंत ते प्रसिद्ध झालेही असेल !

क्रिस्तोफर इशरवुड हे नाव बऱ्याच भारतीय वाचकाना माहिती असेल. कारण त्याना भारतीय धर्माच्या किड्याने चावा घेतलाय. धर्माचं व्हायरस आत गेलंय. त्याच्या आधीच्या पुस्तकात बर्लिनची छान चित्रणे आहेत; पण हे बर्लिन हिटलरच्या उदयाच्या वेळचे आहे. या सद्गृहस्थानी भागीदारीत काही नाटके सुद्धा लिहिली आहेत. इशरवुड हे मूळचे ब्रिटिश; पण पुढे यशाच्या देशांत (USA) स्थायी झालेले. आधी इशरवुड प्रोफेन म्हणजे धर्मनिंदक किंवा देवनिंदक वगैरे होते. शेवटी नास्तिकच खरा आस्तिक बनतो. लोभी साधू बनतो. त्या अनुषंगानेच इशरवुड एक आत्मचरित्र लिहिताहेत. My Guru and his disciple. हे गुरु म्हणजे स्वामी प्रभावनंद.

टकल्या, बास येईल इतका श्रीमंत लेखक (Stinking rich) हेरॉल्ड रॉबिन्स काय लिहीत आहे ? Goodbye, Janette.ऱ्या

पुस्तकात रॉबिन्स असे म्हणतात की, फॅशन आता सौदर्यावर भर देत नाही, तर फॅशन आता सौदा करण्यात आहे. या कादंबरीत तीन अति खंबीर पोलिश बायकाची पात्रे असतील. रॉबिन्सनी फॅशनचे जग फार बारकाईने पाहिले आहे. ते म्हणतात, प्रत्येक फॅशन डिझायनर दुसऱ्या फॅशन डिझायनरचा इतका हेवा व द्वेष करतो की त्याचे वजन डाएट न करताच कमी रहाते. रॉबिन्सचे कपड्याविषयीचे स्वत.चे असे ठाम विचार आहेत. पुरुषानी आपण बायकी दिसू असे कपडे मुळीच घालू नयेत व बायकांनी आपण पुरुषी दिसू असे कपडे घालू नयेत. केसाविषयी मात्र ते काही बोलत नाहीत. ज्या केसेसमध्ये शरीराची वाढ पुरेशी झाली नसेल त्या केसेसमध्ये कपडचावर मोठ्या अक्षरांनी MALE किंवा FEMALE असे टाकावे म्हणजे ओळखणे सुलभ जाईल !

कॅलिफोर्निया हे अमेरिकेतील सर्वांत स्वच्छ व सुदर स्टेट आहे. असे आमच्याकडचे एक डॉक्टर लिमये अमेरिकेला जाऊन आल्यावर म्हणाले होते. बहुतेक फॅशन्ससुद्धा इथेच उगम पावतात असे रॉबिन्स म्हणतात. बाकी पॅरिसला ते बंदिस्त झालेले माफिया म्हणतात, तिथे परदेशातील लोकाना या धंद्यात वाव नाही कोणतेही रॉबिन्सचे पुस्तक सेक्सशिवाय पूर्ण होत नाही. या पुस्तकातही तो मालमसाला भरपूर असेल असे वाटते.

—जे. एन्. पोंडा

## रंगभूमी

# राजवस्त्रातला 'माणूस' शोधणारी 'बखर'

इंडियन नॅशनल थिएटर या संस्थेने आतापर्यंत अनेक 'वेगळ्या प्रकारची नाटके सादर केली आहेत. त्याच परंपरेतील 'बखर : एका राजाची' हे एक नाटक. राजवस्त्रातला 'माणूस' शोधण्याचा हा प्रयत्न नक्कीच प्रेक्षणीय आहे; परंतु तो मनाला पूर्णपणे भिडत नाही.

संपूर्ण भारतदेश इंग्रजांच्या पंज्याखाली पूर्णपणे दबलेला आहे. अनेक छोटीमोठी संस्थाने खालसा झालेली आहेत आणि एका खालसा न झालेल्या संस्थानचा एक राजा—संसारात दु.खी, आजुबाजूच्या कट-कारस्थानानी त्रस्त आणि प्रेमातील अपयशामुळे खचलेला—शेवटी आत्महत्या करतो, अशी ही कथानकाची खूप वरवरची रूपरेषा.

साईखेड या चिमुकल्या संस्थानचा राजा रघुवीरसिंह, हा तरुण आहे, सुशिक्षित आहे. जातपात न मानणारा, विज्ञानावर विश्वास ठेवणारा, प्रजेचं कल्याण व्हावं म्हणून झटणारा, ब्रिटिश राजसत्तेला तोडीस तोड जबाब देणारा, संस्थानच्या हद्दीतून रेल्वेमार्ग नेल्याबद्दल ब्रिटिश राजसत्तेकडून लाखो रुपयाची मागणी करणारा हा राजा आमचा बळकावलेला भू-भाग परत द्या अशी निर्भीड मागणी करतो. दक्षिणेकडील संस्थानावर लक्ष ठेवण्यासाठी नेमलेल्या गव्हर्नरला ब्रिटिशांच्या काळचा कारवायाबद्दल सागताना हा परिणामाची पर्वा करत नाही !

असा हा झपाटलेला राजा आहे. मात्र अगदी एकटा. त्याची तरुण आणि सुदर पत्नी राणी दमयंती त्याला राजपुत्र देऊ शकत नाही हे त्याला पूर्णपणे माहिती आहे. एवढेच नव्हे तर पती-पत्नी एकमेकापासून पूर्णपणे दुरावले आहेत. अशा वेळेला तो आकर्षित होतो त्याला प्रेम देणाऱ्या राजसकडे. साईखेडच्या मुलीच्या शाळेची ही तरुण, सुस्वरूप आणि उच्चशिक्षित मुख्याध्यापिका.

या दोघाना दूर करण्याकरता राणी, तिचे मामा आणि दौलतराव ही अनेक कटकारस्थाने करतात. रंगनाथ हा राजाचा हेर जबर जखमी होतो. (पुढे तो मरणार हे आपण समजतो.) राजाच्या मर्जीतील एक मित्र कम कारकून देसाई याच्यावर नसते बालंट आणले जाते. बलीसाहेब हा मुसलमान फकीर वाईट रीतीने मारला जातो. सरते शेवटी राजसला गाव सोडणे भाग पडते. हे सर्व कशाकरता तर राणीला राजा वश व्हावा म्हणून; पण ते होत नाही. दिशाहीन दिशाच्या कोडीत सापडलेला राजा आत्मघात करून घेतो.

या राजाच्या भूमिकेत श्री. दिलीप कुलकर्णी यानी खूप मेहनत घेतल्याचे जाणवते. ज्याला भूमिकेचा 'आव' म्हणतात तोही यांनी उत्तम सांभाळला, शोभूनही दिसला. फक्त त्याचे हसणे अधिक दमदार हवे होते, भारदस्त हवे होते. त्याचे हसणे वगैरे एकसुरी आवर्तन वाटते. त्याच्यामध्ये अधिक सफाई व सुधारणा ते करतील असे नक्कीच वाटते. बाकी बहुतेक सगळे मूडस् त्यानी चागले सादर केले. तसेच शेवटच्या अंकातील शेवटचा प्रवेश—जेव्हा राजा एकटा असतो व आत्महत्या करतो—तो अधिक उत्कट व परिणामकारक होणे आवश्यक आहे.

राजसच्या भूमिकेत नीना जोशी खरंच शोभून दिसली. (पूर्वी मॉडेलिंग व्यवसायातील ही एकमेव मराठी तरुणी; पण 'महासागर'मधील चपूचे काम करणारी तरुणी हीच का ?) एक निराधार सुविद्य शिक्षिका दुसऱ्या एका निराधार तरुणाला आधार देण्याचा प्रयत्न करीत त्याच्यामध्ये आधार शोधत आहे, हे तिने उत्तम दाखवले. भूमिका समजून केली. संवाद उमजून बोलली, तरी ते अधिक परिणामकारक करील तर अधिक चागले होईल. या भूमिकेच्या गरजा ती बव्हंशी पूर्ण करते हे नमूद करणे आवश्यक आहे.

नयनतारा (राणी दमयंती) अनंत वर्तक (राजाच्या मर्जीतले कारकून देसाई) या दोघाच्या भूमिका लक्षात रहाण्याजोग्या व यथार्थ झाल्या.

बाकी सुधीर जोशी (केशव भट, डॉ. किलपेट्रिक), विजय घमंडे (सुलेमान), सुशील गोलमकर (बलीसाहेब व रॉबर्टस्), सुरेश चिखले (रंगनाथ) व दीपक शिर्के (बळी) याच्या भूमिका चोख झाल्या.

श्री. त्र्यं वि. सरदेशमुख यानी त्याच्याच याच नावाच्या कादंबरीवरून नाटचरूपातर केले आहे. कादंबरी उत्तम असली तरी त्याचे नाटचरूपांतर उत्तम करणे आणि ते नाटक चांगले 'चालणे' या वेगळयाच गोष्टी आहेत. जयवंत दळवी याची नाटके ('गुतता

हृदय हे ' (हे नाटक त्यानी लिहिलेले नाही) व श्री. ना. पेंडसे यांची नाटके अशी काही उत्तम चालली. आनंदी गोपाळ हे नाट्य-रूपांतर व खानोलकराच्या ' अगोचर ' चे नाट्यरूपातर ' कोपता वास्तुदेवता ' आपटले. तात्पर्य हे काम खूप अवघड आहे; परंतु श्री. सरदेशमुख यानी नाट्यरूपात्तर खूपच काळजीपूर्वक व मेहनतीने केले आहे या नाटकाचा पहिला अक बराच लांबतो याचे कारण बहुतेक सर्व व्यक्तिरेखा या अंकात ' एस्टॅब्लिश ' करण्याचा प्रयत्न केला आहे. मोजक्या संवादातून व्यक्तिरेखा नीटपणे उभ्या राहतात. तसेच अक मोठा असूनही अजिबात कटाळा येत नाही, हे वैशिष्ट्य. तसे पाहता सपूर्ण नाटक बघताना कंटाळा येत नाही.

हे नाटक ' बसवून ' ' उभे ' करण्याकरता दिग्दर्शक श्री. सदाशिव अमरापूरकर यानीही बरीच मेहनत घेतल्याचे कळते. पहिल्या अंकातच लेखकाने नाटकाचा 'काळ' निश्चित केला आहे आणि तो काळ सर्व बाबीसह जवळजवळ अचूक पकडण्यात दिग्दर्शक यशस्वी झाला आहे.पात्राच्या हालचाली, दीनानाथ मंगेशकरांच्या दोन रेकॉर्डस् ' परवशता पाश दैवे ' आणि ' जगी हा खास वेडयाचा पसारा–' याची निवड अत्यत समर्पक आहे; परंतु नाटकाच्या दुसऱ्या अंकात मुंबईतील मोठ्या हॉटेलमधील प्रवेशात एकाच वेळी राजा व राजस याची स्वगते आहेत आणि नंतर ते बोलत बोलत एकमेकाकडे ' अनोळखी ' पणे पहातात व राजस खाड्कन निघून जाते. दोघाचीही विश्वे भिन्न आहेत हे सांगण्याचा दिग्दर्शकाचा हा चागला प्रयत्न प्रसंग हवा तेवढा उत्कट न झाल्याने फिका पडतो. तसेच राजस व राजा याची एक मिठी आहे. तो प्रसंगही फार फिका वाटतो. याचे कारण कलाकार तेथे हवे तेवढे समरस होत नाहीत. त्यामुळे तो उत्तम प्रेमप्रसंग किंचित ' वरवरचा ' वाटतो. कलाकारांनी अधिक 'इन्व्हॉल्व' (Involve) होणे आवश्यक आहे. ( पण एकमेकामध्ये नव्हे, भूमिकेमध्ये ! ) तसेच दिग्दर्शनामधील एक बारीक चूक म्हणजे डॉ. केलपॅट्रिकच्या तोडचा O. K. हा शब्द. हा शब्द खास अमेरिकन आहे, ब्रिटिश नाही. इथे जरा सूक्ष्मतेचे भान सुटले आहे. बाकी दिग्दर्शन छान आहे !

व्यक्तिरेखा त्याप्रमाणे वेशभूषा व या दोहोचे भान ठेवून, ' रंगा 'कडे विशेष लक्ष पुरवून नेपथ्य व प्रकाशयोजना केलेले बहुधा हे पहिलेच नाटक असावे. पन्नास वर्षांपूर्वीचे वातावरण हुबेहुब उभे केले आहे. मोठा कर्णा असलेला फोनो, फर्निचर, चित्रे सगळे कसे फिट्ट आहे. हॉटेलमध्ये मोजकेच फर्निचर दाखवूनही त्याचे रंग, भिंती व पडदे याचे रंग (व त्याची प्रसंगोपात्त संगतीही) यातून ते हॉटेल अत्यंत वैभवी आहे हे पटकन कळते. प्रकाशयोजना अनेक रंगी असूनही कोठेही भडकपणा येत नाही हे विशेष. नेपथ्य व प्रकाश ही बाजू श्री. गौतम जोशी यांनी विलक्षण सुरेख साभाळली. त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे !

तर संगीताचे वर्णन ' अप्रतिम ' असेच करावे लागेल. अत्यंत नेमक्या जागी समर्पक उपयोग हे याचे आणखी एक वैशिष्ट्य. श्री. अनंतराव अमेंबल (प्रसिद्ध बासरीवादक डी. अमेल यांचे सुपुत्र, असा माझा अंदाज.) यांनी सनई, चौघडे ,नगारा. व घंटानाद यांच्या उपयोगाने नाटकातील विविध प्रसंगांना मोठा सुरेख उठाव दिला. पाश्चात्त्य पद्धतीचे ऑर्गनचे सूर व राजाच्या जीवनातील एक ब्रिटिश तरुणी क्लारा याचा संबंध फार सुरेख रीतीने जोडलाय. पार्श्वभूमीवरील ते उदास स्वर वातावरण अधिकच गंभीर करतात !

परंतु ती क्लारा व राजा याचे संबंध अधिक उत्तम प्रस्थापित व्हायला हवे होते. शेवटच्या क्लाराच्या पत्राने रघुवीर सिंह मोडतो; पण त्यापूर्वी तिचा किती जबरदस्त पगडा त्याच्यावर आहे हे पूर्णपणे स्वच्छ होत नाही. राजाने मनाच्या तळकप्प्यात जपून ठेवलेली एक मुलायम, सोनेरी अशी आठवण जिच्यामुळे राजा हळवा होतो एवढेच स्वरूप क्लारा व राजासंबंधाचे समोर येते.

तर अशीही ' बखर ' जरूर पाहण्याजोगी. वाईट एवढेच वाटते की, प्रेक्षक पूर्णपणे या बखरीशी, त्यातल्या पात्राशी समरस होऊ शकत नाही. ते संपूर्ण नाटक शेवटपर्यंत ' बखर 'च राहते त्रयस्थपणे वाचली जाणारी. ते काहीही असो, एक उत्तम शोकांतिका रंगमंचावर आणल्याबद्दल इंडियन नॅशनल थिएटरचे आभार मानणे प्रेक्षकांच्या दृष्टीने आवश्यक ठरते.

**– निखिल गजेंद्रगडकर**

## पुणे वार्ता

पृष्ठ २ वरून

श्री. जं. च्या भाषणाचा धागा घेऊन डॉ. गं. ना. जोगळेकर बोलायला उभे राहिले आणि हरिभाऊ आपटेंच्या अस्ताबरोबरच उदयाला आलेल्या वामन मल्हार जोशी व इतर साहित्यिकाच्या साहित्यातील स्त्रीचा त्यानी पोथीनिष्ठ समीक्षकाप्रमाणे समाचार घेतला. आपल्या भाषणात ते म्हणाले,

डॉ. केतकर किंवा वामन मल्हार जोशी याना स्त्रीबद्दल नुसती सहानुभूती किंवा अनुकपा नव्हती. तिच्याबद्दल त्याच्या मनात कौतुकाची भावना होती. त्यांचे प्रश्न समजावून घेण्याची ज्ञानलालसा या दोघाजवळ होती; पण तरीही केतकरांच्या कादंबरीविश्वात स्त्रियाना स्थान कमी होतं, त्याच्या वाङ्मयात बौद्धिक मेजवानी मिळते; पण ते अस्वस्थ करत नाही. त्या मानाने मग मामा वरेरकरानी स्त्रीचं चित्रण अधिक यशस्वीपणानं केलं.

'याच कालखंडात य. गो. जोशी, नारायण हरी आपटे यानी आपल्या वाङ्मयातून बंडखोर स्त्रीचं चित्रण चागल्या तऱ्हेनं केलं. तसंच विभावरी शिरूरकर यांनीही आपल्या लिखाणातून स्त्रीचं वेगळं दर्शन घडवलं. या टोपण नावानं लिहिणाऱ्या मालतीबाई बेडेकराच लिखाण केवळ पुस्तकी नव्हतं. प्रत्यक्ष जीवनातून, अनुभवातून ते आलेलं होतं. स्त्रीचं खरं जीवन त्यांनी नेमक्या वेळी आणि नेमक्या शब्दात प्रकट केलं. हे लेखन म्हणजे प्रातिनिधिक स्वरूपातील जिवंत उद्गार होता, म्हणूनच त्याच्या वाङ्मयाला एक निराळी प्रतिष्ठा लाभली. '

डॉ. जोगळेकरानंतर ' सोबत 'चे सपादक ग. वा बेहरे बोलायला उभे राहिले. ' चाळीस वर्षांपूर्वी मराठी साहित्यात जे बंड निर्माण झालं त्याच्याजवळ मी राहतो ' असा मालतीबाई आणि स्वत च्या जवळिकीचा सूचक उल्लेख करून श्री. बेहरे म्हणाले, 'पण त्यानंतरच्या फडके–खाडेकर–माडखोलकर याच्याकाळातील साहित्यात या बंडाची नाव–निशाणीसुद्धा शिल्लक राहिलेली

दिसत नाही. अर्थात ज्याच्या हातात साहित्याची सूत्रे गेली तेच याला जबाबदार आहेत.

या तिघानीही स्त्रीच्या दु खाकडे कानाडोळा करून स्वत.च्या सुखासाठी स्त्रीचा साधन म्हणून वापर आणि व्यापार केला, पण त्यामुळे आमच्या स्त्रिया कायमच्या दुबळ्या झाल्या. मालतीबाईंनी उभारलेलं बंड जागच्या जागीच विझलं. फडके–माडखोलकरानी फक्त क्षुधेला, वासनेला आवाहन करणारं साहित्य निर्माण केलं, तर खाडेकरांच्या साहित्यातली माणसं रुग्णाईत वाटतात. एके काळी आम्ही त्याच्या साहित्यानं प्रभावित झालो होतो याचं आज आश्चर्य वाटतं, हसूही येतं.

'शृगाराच्या गोळ्या देऊन समाजाला काही काळ पूर्णपणे झोपवणाऱ्या या लेखकांनी स्त्रीला स्वत चं सुख निवडण्याचा हक्कच दिला नाही, हा एक फार मोठा सामाजिक गुन्हा मानला पाहिजे; पण मालतीबाईनी उभारलेलं बंड आजच्या स्त्री–लेखिकाच्या लिखाणातही दिसत नाही. म्हणून आज पुन्हा एकदा या पंचाहत्तर वर्षांच्या तरुणीनंच बंडाचा झेडा हाती घ्यावा !

शेवटी डॉ. सौ. अंजली सोमण 'स्वातंत्र्योत्तर कालातील स्त्री–दर्शन' या विषयावर बोलायला उभ्या राहिल्या. प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या या बाईनी आधुनिक साहित्यावर एक शेरा आणि एक उदाहरण या वेगाने चौफेर टोलेबाजी केली. स्वातत्र्योत्तर काळानतर स्त्रीच्या समस्या फारशा बदललेल्या नाहीत आणि काही अपवाद वगळता कोणत्याच साहित्यिकाने स्त्रीचं परंपरेपेक्षा निराळ चित्र रंगवलं नाही, हा मुद्दा डॉ. सोमण यानी सोदाहरण वारवार ठसवला आणि शेवटी 'आजची स्त्रीही कालच्या स्त्रीपेक्षा फारशी बदलली नसल्यामुळं साहित्यातील तिचं रूपही फारसं बदललं नाही अस म्हणून समेटही केला.

शेवटी कार्यक्रमाच्या अध्यक्षा आणि उत्सवमूर्ती मालतीबाई बेडेकर यानी या सवंध चर्चेचा समारोप केला. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या –

'कादंबऱ्याच्या उदयापासून मराठी साहित्यात कृत्रिमता आली. म्हणून स्त्रीचं खरं दर्शन त्या त्या कालातील लोकसाहित्यामध्ये आणि आत्मचरित्रामध्येच घडतं. लेखकाच्या हृदयाचा प्रामाणिकपणा फक्त तिथेच जाणवतो.

'त्याचं मुख्य कारण असं की, इतर लेखकानी प्रत्यक्ष अनुभव न घेताच मनामध्ये विशिष्ट आडाखे बाधून त्यानुसार स्त्रियाची चित्रं रंगवली. स्त्रीसुधारणा कोणत्या हव्या आहेत हे लक्षात घेऊन हरिभाऊंनी लिहिलं, त्यामुळं त्याच्या स्त्रिया बाहुल्यासारख्या वाटतात.

'माझं असं स्पष्ट मत आहे की स्त्री आणि पुरुष या दोघानाही परस्पराच्या मनाचे पापुद्रे पूर्णपणे उलगडून दाखवता येणं अशक्य आहे. कारण स्त्री आणि पुरुष ही परस्पराना पडलेली कोडीच आहेत असं मला वाटतं.

'या सर्वच साहित्यावद्दल माझा आणखी एक आक्षेप आहे तो म्हणजे, या साहित्यामधून सदैव दुवळ्या, रडक्या, गाजलेल्या अशाच स्त्रियाचं चित्रण करण्यात आलं. स्वत.च्या हिंमतीवर उभ्या राहणाऱ्या आणि समाजाला वाकवणाऱ्या समर्थ स्त्रिया आमच्या साहित्यिकानी का रंगवल्या नाहीत हे काही मला समजत नाही. आपल्या भोवताली असणाऱ्या सुशिक्षित स्त्रियाच्या वर्तुळापलीकडे अशाही स्त्रिया मी पाहिलेल्या आहेत; पण आमच्या साहित्यात मात्र त्या कुठंच आढळत नाहीत. त्यामुळे एका फार मोठ्या समाजाच्या चित्रणाला आपण पारखे झालो आहोत '

कमालीचा अनौपचारिकपणा आणि तरीही मुद्देसूद अनुभवसिद्ध मांडणी हे मालतीबाईंच्या भाषणाचे दोन मुख्य विशेष. याचबरोवर त्यानी ठेवलेलं वेळाचं भानही लक्षणीय होतं. कारण वृद्धत्व आलं की आपल्याला पुन्हा बोलायची संधी मिळेल की नाही या चितेनं म्हातारी माणसं एकदा बोलायला मिळालं की श्रोत्याचा अगदी अंत पाहतात असा अनुभव याच सभागृहात मी अनेकदा घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवरही मालतीबाईंचं भाषण प्रभावी होतं.

केवळ दोन तासाच्या अवधीत पाच-सातशे वर्षांतील मराठी साहित्याचा विशिष्ट दृष्टिकोनातून आढावा घेणं तशी सोपी गोष्ट नव्हती; पण सर्वच वक्त्यांनी हे लक्षात घेऊन फक्त महत्त्वाच्या मुद्द्यांचा सोदाहरण निर्देश केल्यामुळं कार्यक्रम आटोपशीर झाला आणि श्रवणीयही ! साहित्यिकाचा वाढदिवस अशा आगळ्या पद्धतीनं साजरा केल्याबद्दल साहित्य परिषदेचे संयोजकही अभिनंदनास पात्र आहेत.

–प्रतिनिधी

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**


**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

**लेखक : वि. ग. कानिटकर**

**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**

**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**


अर्थाविण शब्दाचे वारे
जेवी गंधाविण पुष्पकोश...
शब्दाला अर्थ हवा, फुलाला गंध हवा.
पण शब्दांचा वापरही संयमानं
आणि जाणीवपूर्वक केला पाहिजे.
नाहीतर अर्थाचा अनर्थ होतो....
पैशाचंही तसंच आहे.
पैसा वाटेल तसा वापरला, की अनर्थ होतो.
म्हणून पैशाचा वापर संयमानं करुन
जाणीवपूर्वक बचत केली पाहिजे.
त्यासाठी आमच्या विविध लाभदायी
योजना समजावून घ्या.
बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कार्यालय :
लोकमंगल, पुणे ४११००५
बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा
पद्मजा

# 'एक होता कार्व्हर 'चे स्वागत

**'एक होता कार्व्हर' ही प्रदीर्घ चरित्र-लेखकथा माणूस दिवाळी अंकात (१९७९) प्रसिद्ध झाली आणि लेखिकेवर अभिनंदनांचा वर्षाव झाला. शेकडो पत्रे आली. सर्वसामान्य वाचकांपासून जाणकारांपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्त दाद दिली. पुढे दिलेल्या निवडक पत्रांवरून व त्यातील निवडक भागावरून मराठी वाचकांनी केलेल्या कार्व्हरच्या या उत्स्फूर्त स्वागताची थोडीफार कल्पना येऊ शकेल.**

**श्री. द. ना. जोशी. (निपाणी)**

'...प्रस्तुत प्रदीर्घ लेखातून सर्वांनाच—राज्यकर्ते, समाज, शिक्षक, विद्यार्थी आणि तथाकथित व्यापाऱ्यांना बरेचसे घेण्यासारखे आहे, पण या साऱ्यांचे लक्ष जाईल तेव्हा ना ?...'

**श्री. सुधाकर कराळे (देवळाली-प्रवरा)**

'... 'माणूस' भेटला...डॉ. कार्व्हर दिसले. नवीन 'माणूस' ...जुजबी ओळख करून घ्यावी असे वाटले.

...डॉ. कार्व्हर महावस्ताद माणूस ! ती ओळख अगदी पक्की झाली.

**श्री. वि. गो. तथा दादासाहेब पाठक (राजगुरुनगर)**

'...कार्व्हरचं जीवन एका गतिमान पद्धतीनं अन् अतीव जिव्हाळ्यानं चित्रित केलं आहे. त्याच्या जीवनाचे अद्वितीय धागे इतक्या सहजपणे उकलत जातात की आपण एका अननुभूत अशा वातावरणात पोचलो आहोत हे नंतर लक्षात येतं ! कार्व्हरबरोबर हिंडणारं आपलं मन परत फिरायला तयार होत नाही ... त्याची वाट सर्वांनी जावं अशी आहे ... श्रमाला प्रतिष्ठा आणि सेवेला गौरवाचं स्थान प्राप्त करून देणारा कार्व्हर लोकांच्यापुढे ठेवून एक मोठं काम केलं आहे.'

**श्री. द. वि. पोतनीस (मद्रास)**

'लेख उत्कृष्ट आहे ... टस्कगीबद्दल जास्त माहिती हवी.'

**श्री. र. वा. परांजपे (मालाड, मुंबई)**

'अखंड परिश्रम, अभ्यास, निष्ठापूर्ण जीवन या गुणांवर जगलेले डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर याचे जीवनदर्शन तर अपूर्व वाटले.'

**श्री. बंडोपंत सरपोतदार (नवी दिल्ली)**

'... 'एक होता कार्व्हर' ही एक नुसती अमेरिकेतील काळ्या (निग्रो) असामान्य व्यक्तीची कहाणी नसून आजच्या भारतीय समाजाला मार्गदर्शन करणारा तो मानवी दीपस्तंभ ठरेल !

असो. मी तो लेख येथे (दिल्लीत) बऱ्याच मंडळींना वाचावयास दिला होता. प्रत्येक जण माझ्यासारखाच भारावून गेला.'

**श्री. एस्. वाय्. रानडे (बुरंबाड, रत्नागिरी)**

'... निराशेतून आशा, विभक्तीतून भक्ती, मानमरातबातून विनम्रता, प्रयोगशीलता, स्वावलंबनासाठी धडपड आणि महत्त्वाचे म्हणजे मरगळलेल्या मनाला तजेला देणारी ही कलाकृती.'

**श्री. वा. र. गोडे (जोशीवाडी, दादर)**

'... प्रतीकूल परिस्थितीशी विलक्षण झगडा देऊन तो एक असामान्य पुरुष म्हणून जगला. आपण त्याला मराठीमध्ये आणलात, ओळख करून दिली. त्याबद्दल आपले अत्यंत आभार ...'

**श्रीमती सुनंदा भोसेकर (ठाणे)**

'... तुम्ही जे लिहिलं ते अत्यंत आवडलं छान उलगडत गेलं. ते पुस्तकरूपानं प्रसिद्ध व्हावं.'

**श्री. वि. ल. खरे (नागपूर)**

'... कार्व्हर याची जीवनकथा वाचताना मी गुंग होऊन गेलो... मराठी वाङ्मयाचे दालन सुशोभित केले आहे'

**श्री. नारायण खुळे (फुलगाव)**

'... स्वार्थांध अशा या जगात सामान्य माणसाला साधे जीवन जगण्यासाठीच अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यातून उसळी मारून वर येणारा कार्व्हर विरळाच. दलितांना, पिचलेल्यांना तर कार्व्हर दीपस्तंभ ठरेल.'

**श्री. गोपाळ एस्. बर्वे (वसई)**

'... आपल्या देशातील जीवन फारच वैफल्यावस्थेत आहे. भ्रष्टाचार, स्वार्थसाधू वृत्ती, वचनातला खोटेपणा हे सारे पाहिले म्हणजे आपण प्रसिद्ध केलेला लेख किती समयोचित आहे याचे महत्त्व पटते. हे एक मोठे सामाजिक कार्यच आपण केले आहे !'

**श्री. प्र. शा. खेडलेकर (नासिक)**

'...आतापर्यंत जे वाचलं ते खरं वाचणं नव्हतच, 'कार्व्हर' याचं चरित्र मी जेव्हा वाचून पूर्ण केलं तेव्हा कुठे वाचन खऱ्या अर्थानं सार्थकी लागल्यासारखं वाटलं असं म्हटलं तर ते खोटं ठरू नये. एक अमोल ठेवा आपण सादर केलात याबद्दल धन्यवाद !'

**श्री. एस्. के. कारखानीस (मालाड)**

'...वास्तविक हे चरित्र असून सुद्धा आपण आपल्या भाषाशैलीने ते इतके मनोवेधक केले आहे की, ते संपूर्ण वाचून होईपर्यंत खाली ठेवावेसेच वाटत नाही.'

**श्री. वा. श्री. दीक्षित (भद्रावती, कर्नाटक)**

'...एक होता कार्व्हर या लेखाचे कौतुक करावे तेवढे थोडेच. लेखाची सुरुवात, शेवट, भाषाशैली, मांडणी या सर्वांचे वर्णन एकाच शब्दात करणेचे झाल्यास 'अत्युत्तम' हाच तो शब्द...कार्व्हरचे हे छोटे पुस्तक छापून ते प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचले पाहिजे !'

**श्रीमती शि. र. हेरवाडकर (मुंबई)**

'...हे चरित्र मला खूप आवडलं...हे पुस्तकरूपानं प्रसिद्ध व्हावं असं वाटतं...साधी, सोपी, कथनात्मक लेखनपद्धती यामुळं चरित्र खूपच लक्षणीय झालं आहे. हे पुस्तकरूपानं प्रसिद्ध झाल्यास ते अधिकाधिक वाचकापर्यंत पोचेल, त्याला अधिकाधिक दाद मिळेल आणि न जाणो, एखादा सुप्त शास्त्रज्ञ जागा होऊन यापासून स्फूर्ती घेईल अशा एखाद्या कार्व्हरची आपल्या देशाला नितात गरज आहे'

**श्री. के. द. वडगीकर (औरंगाबाद)**

'...उपेक्षित मानकऱ्याची चरित्ररेखा सादर करून लेखिकेने एक नवी वाट धुडाळली आहे. लोकजीवनात लोकाच्या गरजानुसार संशोधन करून त्याच्या जीवनाला समृद्धीच्या वाटा दाखविणे हेही मौलिक संशोधन ठरावे!'

**प्रा. श्री. हे. शा. बेडेकर (रत्नागिरी)**

'...आमच्या शालेय विद्यार्थ्यांसमोर आजच्या सर्वदूर राजकारणाच्या, शिक्षणक्षेत्रातील, दैनंदिन जीवनातील, शैक्षणिक संस्थातील, संशोधनसंस्थातील राजकारणाच्या जमान्यात, ध्येय घेऊन देशासाठी, पददलितासाठी एकदोन माणसे स्वप्रयत्नाच्या जोरावर काय करू शकतात याचे हे एक उदाहरण ज्याला काही करायचे आहे, त्याच्याजवळ भरपूर प्रयत्न व थोडीशी संधी मिळताच काय करता येते याचा आदर्श, आजच्या विद्यार्थ्यांना अशा माध्यमातून दाखवून फारच योग्य काम बजावले आहे.'

**श्री. प्रमोद गाजरे (माटुंगा)**

'...अतिशय मुद्देसूद आणि तरीही रसाळ भाषेतील हे लेखन मला फार आवडल. एका आगळ्या शास्त्रज्ञाची ओळख करून दिल्याबद्दल धन्यवाद!'

**श्री. मो. म. कुलकर्णी (वसई)**

'...कार्व्हर' सुदर आहे समयोचित देखील आहे'

**श्री. शि. जो. शिर्के (चिपळूण)**

'..लेख तर चागला होताच; पण आपल्या मनोगतानेही चटका लावला..(कार्व्हरची) भेट म्हणजे माझ्या आयुष्यातील एक अविस्मरणीय अनुभव!'

**श्री. जगदीश हिंगे (अहमदनगर)**

'..अशा एखाद्या कार्व्हरचा (योगायोगाने) परिचय झाल्यावर इतराची ओळख या महात्म्याशी झाली पाहिजे अशी तळमळ वाटणे, त्यासाठी जिवाची उलघाल होणे व जिद्दीने माडी घालून प्रत्यक्ष कृती घडणे हे फार दुर्मिळ आणि म्हणून फार महत्त्वाचे!' कार्व्हर तर मनात घर करून बसला आहे'

**श्री. अरविंद गजेंद्रगडकर (बोरिवली)**

'..संगीतातला माणूस मी. आवडलेल्या जागेला दाद दिल्याशिवाय चैन पडेना ..आजच्या जीवनाच्या प्रचंड पोकळीत एका 'सुदर असण्याची' भर घातली आहे कशासाठी जगावं या प्रश्नाला एक तरी समर्पक उत्तर मिळत आहे. कार्व्हरसाठी तुम्ही घेतलेले परिश्रम सार्थकी लागले. अशा कर्तृत्ववान व्यक्तीचे चरित्र आजच्या तरुणासमोर ठेवून एक मोठे कार्य करीत आहात. शुभ कामना!'

**सौ. लता साठे (बेळगाव)**

'. हल्लीच्या सत्तेकरिता चाललेल्या corruption च्या पार्श्वभूमीवर हे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रत्येक कॉलेजमधील मुलाने वाचावे व अंशभर तरी आचरणात आणावे. नाही तर खरच आपल्या देशाचा 'अलावामा' व्हायला फारसा वेळ लागणार नाही!'

**श्रीमती सुमती देवस्थळे (अंधेरी, मुंबई)**

'...कार्व्हर तुम्हाला फार आवडला, पटला अन् तो सहानुभव इतर मराठी वाचकानाही देण्यासाठी तुम्ही खटपट केलीत, याबद्दल धन्यवाद...आशय वाचकाच्या मनात योग्य प्रकारे कोरला जातो.'

**डॉ. उल्हास कोल्हटकर (डोंबिवली)**

'..अशी आदर्श व्यक्तिमत्त्वे समाजापुढे ठेवण्याची आजच्या कालाची आत्यतिक गरज आहे. संपूर्ण कार्व्हर पुस्तकरूपाने आमच्या भेटीस येवो हीच इच्छा!'

**श्री. ज. वि. धायगुडे (भादे, सातारा)**

'...डॉ कार्व्हर याचे चरित्र वाचून जो आनंद झाला तो अवर्णनीय आहे. कार्व्हर याचे सर्व चरित्रच अद्‌भुत व स्फूर्तिप्रद आहे. भूतदयेने ओतप्रोत भरलेले कार्व्हर याचे अंतःकरण पाहिल्यावर मला आपल्याकडील संताची आठवण झाली. फक्त त्यात फरक एवढाच की, हा संत विज्ञानाशी झटे-झोंबी खेळून दुःखीकष्टी मानवाचे दुःख परिहार करण्यासाठी राबणारा आहे. हा पौर्वात्य व पाश्चात्यामधला मूलभूत फरक आहे. असे उत्कृष्ट आधुनिक संतचरित्र मराठी वाचकाना उपलब्ध करून दिल्याबद्दल त्रिवार धन्यवाद!'

**श्रीमती मुक्ता श्रोखंडे (पुणे)**

' तुमचा 'एक होता कार्व्हर' वाचला नि अगदी भारावून गेले. खरंच तुम्ही फार मोठे काम केले आहे.'

**श्रीमती इंदू सामंत (मुंबई)**

'' कार्व्हरचे चरित्र वाचले आणि आपणास काहीतरी खूप चागले उद्‌बोधक, प्रेरणामय असे वाचावयास मिळाले याचा अत्यानंद झाला. कार्व्हरची जिद्द जर आमच्या विद्यार्थ्यांमध्ये येईल तर किती चागले होईल?'

**डॉ. पाटणकर (जालना)**

' चरित्र वाचल्यावर माझी माझ्या जीवनाविषयीची दृष्टीच बदलली. माझेच मला १० वर्षांनी तरुण झाल्यासारखे वाटते.' □

---

**असे भरघोस स्वागत लाभलेला कार्व्हर आता आणखी काही तपशील बरोबर घेऊन पुस्तकरूपाने मराठी वाचकांच्या भेटीस पुन्हा लवकरच येत आहे.**


# एक होता कार्व्हर । लेखिका : सौ. वीणा गवाणकर । राजहंस प्रकाशन

# दिवाळी अंकाची दवंडी....दवंडी....दवंडी....

संपादक ' माणूस ' यांस,

☐ शेतकरी संघटनेचा नेता–शरद जोशी महाराष्ट्रातील खेड्याखेड्यातून सभा घेत आहे. प्रचंड संख्येनं शेतकरी आणि शेतमजूर त्याच्या सभेला उपस्थित रहात आहेत. रात्री दोन अडीच वाजताच्या सभेला देखील आठदहा हजार लोक आणि शेदिडशे बाया शरद जोशीचा शब्दन् शब्द कानात प्राण ओतून ऐकत असतात.

मागील आठवड्यात मी आणि माझी बायको शरद जोशीच्याबरोबर एका झंझावती दौऱ्यावर जाऊन आलो. जळगाव धुळे, नासिक ह्या जिल्ह्यात अडीच दिवसात त्यांच्या सोळा सभा झाल्या. प्रचंड संख्येनं उपस्थित असलेल्या ग्रामस्थाचा उत्स्फूर्त प्रतिसाद डोळे दिपवणारा होता. एका ठिकाणी तर पहाऱ्यावर असलेला एक पोलीसदेखील भान विसरून श्रोत्याबरोबर जोशीच्या भाषणाला दाद देत होता. मी स्वत: अशा प्रकारच्या सभा ह्यापूर्वी कुठही पाहिल्या नाहीत.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनानं आता जबरदस्त वेग घेतला आहे. दिवाळीच्या सुमारास साखर पंचवीस रुपये किलो होईल–पन्नास किंवा शंभर रुपये किलोदेखील होईल असा शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांचा अदाज आहे. हे टाळणं सरकारला सहज शक्य आहे. उसाला टनाला तीनशे रुपये आणि कांदा शंभर रुपये क्विंटल अशी रास्त मागणी शेतकरी करतो आहे.

हे आंदोलन फक्त बागायतदार शेतकऱ्यांचे आहे असा जर कुणाचा समज असेल तर तो संपूर्णपणे चुकीचा आहे. आज शेतकरी, शेतमजूर, उस तोडणीचा कामगार आणि साखर कारखान्यातील कामगार एकत्र आले आहेत. शेतकरी संघटनेचा कुठल्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही. त्यांचा कार्यक्रम एक कलमी आहे. उसाला भाव तीनशे रुपये टन–कांदा शंभर रुपये क्विंटल!

असं हे जबरदस्त आंदोलन उभं करणारा हा शरद जोशी कोण ? कुठला ?–दिसतो कसा, बोलतो कसा, कुठं राहतो, काय करतो ? महाराष्ट्रच नव्हे तर कर्नाटक, तामीळनाडु, हरयाना येथील शेतकरी आज त्यांच्याशी संपर्क साधत आहेत – ह्याचं गुपित काय ?

' माणूस ' च्या येत्या दिवाळी अंकात बळीराजाला जागं करणाऱ्या या शरद जोशीची कथा मी सादर करीत आहे. ग्रामीण भागातील वाचकांना ही कथा अतिशय मार्गदर्शक ठरेल ह्याबद्दल माझ्या मनात तिळमात्र संशय नाही. त्याचबरोबर ' इंडियन ' न झालेल्या शहरातील भारतवासियांनादेखील शरद जोशीचे विचार अंत र्मुख करतील अशी मला खात्री आहे.

दिवाळीला साखर कडू लागण्याचा संभव आहे पण ह्या ' योद्धा शेतकऱ्याचे ' विचार अमृताप्रमाणे आपली मेलेली मनं जिवत करतील अशी मी वाचकाना हमी देतो.

– विजय परुळकर, पुणे

# योद्धा शेतकरी...योद्धा शेतकरी...योद्धा शेतकरी...

आगामी माणूस दिवाळी अंकात सादर होणारा हा एक विषय

– इतर बरेच काही –

☐ एक कादंबरी .... अन्वर सलीम ... प्रतिभा रानडे (काबूल)

☐ प्रदीर्घ मुलाखत .... पांडु खाडे

☐ कथा .... ललित लेख ... इत्यादी

आणि

## ' होता कुरूप वेडा तो राजहंस एक ! '–थोर साहित्यिकाची व्यक्ति-वाङ्मयकथा

शिवाय

## साखरसम्राटाच्या आयुष्यातील एक दिवस टिपणारी-चक्रावून टाकणारी एक दीर्घकथा

अधिक तपशिल पुढील अंकी.